# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९८ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**


**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : २०**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष दुसरे / अंक १० / एप्रिल १९९८



## संपादकीय

### वास्को-द-गामा - किती हवा किती नको !!

पुढील महिन्यात 'वास्को- द -गामा' च्या 'भारताच्या शोधा' ला ५०० वर्ष पूर्ण होतील. जगाच्या इतिहासामध्ये या घटनेची विशेष नोंद घेतली जाते. वास्को -द -गामाच्या या सागरी प्रवासामुळे पश्चिम युरोप, भारत आणि पूर्वेकडील देशांशी सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक आणि व्यापारी संबंधांनी जोडला गेला. १५ वे शतक हे ह्या दृष्टीने फार महत्वाचे आहे. कोलंबस आणि वास्को द गामा हे जवळ जवळ समकालीनच. कोलंबस हा स्पेनचा नागरिक तर वास्को- द -गामा हा पोर्तुगालचा नागरिक. युरोपच्या पश्चिम किनाऱ्यावरिल हे दोन शेजारी देश. कोलंबस भारत शोधायला निघाला आणि नवीन जगाचा म्हणजे 'अमेरिका' खंडाचा शोध त्याने लावला. कोलंबसने आपल्या ५७ वर्षांच्या आयुष्यात (१४५१ ते १५२४) नवीन जगाचे ४ सागरी दौरे केले. वास्को-द-गामाचा जन्म १४६० साली पोर्तुगालमध्ये झाला आणि १५२४ साली कोचीन, भारत येथे त्याचे निधन झाले. आपल्या ६४ वर्षांच्या आयुष्यांत त्याने ३ सागरी दौरे केले (१४९७ ते १४९९, १५०२ ते १५०३ आणि १५२४). याच कालखंडात पश्चिम युरोपमधील इंग्लंड आणि हॉलंड या देशांमध्येही सागरी प्रवास आणि सागरी व्यापार मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. पश्चिम युरोपमधील या सर्वच राष्ट्रांमध्ये यांमुळे व्यापार, धर्मप्रसार आणि राजकीय वर्चस्व स्थापन करण्याची चढाओढच सुरू झाली. इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, स्पेन आणि पोर्तुगाल यांनी दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि आशिया खंडामध्ये मोठ्या प्रमाणावर वसाहती स्थापन केल्या. आणि म्हणूनच वास्को -द- गामाच्या भारताच्या या सागरी प्रवासाला इतिहासात महत्त्वाचे स्थान दिले जाते. अनेक इतिहासकार ही घटना म्हणजे वसाहतवादाचा उगम मानतात. इ.स. १६०० मध्ये 'ईस्ट इंडिया' कंपनी उदयास आली. वास्को द गामाच्या

(मुखपृष्ठ २ वर)

वेळच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक परिस्थितीचा अभ्यास केल्याशिवाय वास्को -द -गामाच्या या सागरीप्रवासामुळे इतिहासाला मिळालेल्या कलाटणीची नीटशी कल्पना येऊ शकणार नाही. वास्को -द -गामाच्या भारत भेटीला ५०० वर्षे पुरी होत असताना साजऱ्या होणाऱ्या महोत्सवांना मोठ्या प्रमाणावर जो विरोध होत आहे त्यामागील भूमिका समजावून घेण्याकरिता १५व्या शतकामधील या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जडणघडणीची माहिती असणे आवश्यक आहे. वास्को - द -गामाच्या भारताच्या शोधाच्या ५०० वर्षांच्या समारोहाला सर्वात मोठा आणि कडवा विरोध हा 'मुसलमान' आणि 'डाव्या' सिद्धान्तवाद्यांचा आहे. डाव्यांचा विरोध असण्याचे मुख्य कारण म्हणजे वास्को -द- गामामुळे वसाहतवाद आणि साम्राज्यवादाचा जो उदय झाला त्यामुळे आहे. स्पेन आणि पोर्तुगालवासीयांना जरी भारताच्या समुद्रप्रवासाचा मार्ग माहित नव्हता तरी अरबी मुसलमान मोठ्या प्रमाणावरती भारताशी व्यापार करीत आणि या सर्वच समुद्रावरून चालणाऱ्या व्यापारावर त्यांचेच प्रभुत्व होते. १५व्या शतकापर्यंत पश्चिम युरोपमधील या राष्ट्रांचा भारत आणि इतर अशियाई राष्ट्रांशी जरी मोठा व्यापार नसला तरी अरब राष्ट्रांच्या मध्यस्थीने हा व्यापार मोठ्याप्रमाणावर व्यापार चाले. अरब म्हणजे मुसलमान व्यापारी आणि खलाशांची या संपूर्ण व्यापारावर पकड आणि मक्तेदारी होती. पश्चिम युरोपमधील राष्ट्रे ही जरी ख्रिस्तीधर्म पाळणारी असली तरी आफ्रिकेतील कित्येक देश, आणि अरबी राष्ट्रे इस्लामचे अनुयायी होते. १५व्या शतकाच्या आधी या दोन धर्मांमध्ये मोठ्या प्रमाणावर युद्धेही झाली. वास्को द गामाच्या भारताच्या शोधामुळे समुद्रावरील व्यापारामध्ये इस्लाम पंथीयांची असलेली मक्तेदारी कमी होऊन ती ख्रिस्ती धर्मपंथीयांच्या हातात गेली.

वास्को -द- गामाचा पहिला भारताकडील प्रवास लिस्बन् पोर्तुगालमधून ८ जुलै १४९७ला सुरू झाला. दक्षिण आफ्रिकेचे टोक म्हणजे केप ऑफ गुडहोप पर्यंत (Cape of Good Hope) पोर्तुगीज जहाजे प्रवास करत होती पण त्याला वळसा घालून भारतापर्यंत प्रवास करणारा वास्को-द-गामा हा पहिलाच युरोपियन प्रवासी. केप ऑफ गुडहोप पर्यंतच्या समुद्री प्रवासाच्या मार्गाचा शोधही फक्त १० वर्षे आधी म्हणजे १४८८ मध्ये लागला होता. १४९५ मध्ये पोर्तुगालची राजसूत्रे मॅन्युअल (Manuel) या राजाकडे आली. या राजाने वास्को - द - गामाला भारताचा शोध लावण्याकरिता पाठवले. मॅन्युअलच्या आधीचा पोर्तुगीज राजा जॉन (John) यानेही भारतीय समुद्रावरील अरबी व्यापारांची मक्तेदारी मोडण्याकरिता प्रयत्न केले होते. वास्को-द-गामा आपल्या ४ मोठ्या जहाजांबरोबर तयारीने प्रवासाला निघाला. त्याच्याबरोबर ३ दुभाषीही त्यानी घेतले. यातले दोन अरबी भाषा जाणणारे तर एक 'बांटू'च्या बोलीभाषा जाणणारा होता. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वास्को-द-गामा जवळ ख्रिश्चन धर्माचा प्रसार भारतीय खंडात करण्याकरिता तत्कालीन पोपचे आज्ञापत्र होते. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याला असलेले बहुतेक देश हे इस्लाम धर्मीय होते. आजचे मोझांबिक (Mozambique), टांझानिया (Tabzania) आणि केनिया (Kenhya) या सर्व आफ्रिकी देशांना आपल्या प्रवासात वास्को -द -गामाने भेटी दिल्या. आपल्या पहिल्या प्रवासांत केनिया येथूनच त्यानी भारताचा सागरी मार्ग दाखवणारे खलाशी घेतले. वास्को-द-गामाने आपल्या तीनही प्रवासात या आफ्रिकन राष्ट्रांमधिल मुसलमान खलाशी आणि रहिवाशी यांच्यावर अनंत जुलूम केले. आणि म्हणूनच केनिया आणि टांझानिया मधील मुसलमानांचा सुद्धा या समारोहाला कडवा विरोध आहे. आपल्या पहिल्या प्रवासात केनियाहून निघाल्यावर हिंदी महासागर ओलांडून कालिकतला पोचायला वास्को-द-गामाला २३ दिवस लागले आणि मेच्या २०तारखेला तो कालिकतला पोचला. त्यावेळी कालिकतला झामोरिन (Zamorin) हा हिंदू राजा राज्य करीत होता. कालीकत ही त्याकाळी व्यापाराची फार मोठी पेठ होती. हा सर्व व्यापार आणि बहुतेक सर्व खलाशी हे मुसलमान होते. झामोरिनचे या मुसलमान खलाशी आणि व्यापाऱ्यांशी अतिशय चांगले संबंध होते. झामोरिनने वास्को-द-गामाचेही स्वागत केले. वास्को-द-गामा कडील वस्तू या कालिकतच्या व्यापारांना फारशा आकर्षित करू शकल्या नाहीत.

(मलपृष्ठ ३ वर)

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष दुसरे/ अंक १०/एप्रिल १९९८

**संपादक**
डॉ. विजय वा. बेडेकर

**सहसंपादक**
श्री. प्रकाश ल. वैद्य

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**वार्षिक देणगी**
रु. २०० / -

**मुद्रक :**
परफेक्ट प्रिण्टस,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## *अनुक्रमणिका*

| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) सुभाषित | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) भारतीय विद्या आणि पुरातत्व व कलेतिहास | डॉ. अ.प्र. जामखेडकर | ५ |
| ४) वेदार्थ पद्धती-योग आणि यज्ञविधीचे स्थान | डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी | १४ |
| ५) शिल्पकलानिधी कृ.वि. वझे | डॉ. र. पु. कुलकर्णी | २७ |
| ६) एक्टोप्लाझम व मूर्त देह निर्मिती | श्री. व. वि. अकोलकर | ३१ |
| ७) परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३६ |
| ८) पर्यावरणाचे वाढते तापमान आणि अमेरिकन उद्योग समुहाची भूमिका | | ३९ |

# लेखक - परिचय

१. **डॉ. विजय वा. बेडेकर**

वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. **प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर**

संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधूननिवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती; संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. स्तबक या पुस्तकाचे लेखक.

३. **डॉ. अ.प्र. जामखेडकर**

निवृत्त संचालक, महाराष्ट्र राज्य पुरावस्तु आणि संग्रहालय विभाग. अनेक संशोधनपर शोधनिबंध प्रकाशित.

४. **डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी**

वेद आणि वेद वाङ्मयाचे अभ्यासक. वैदिक संशोधन मंडळ येथून निवृत्त. अनेक संशोधन निबंध प्रकाशित.

५. **श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी**

अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

६. **श्री. वसंत वि. अकोलकर**

जन्म ६ जुलै १९११. पुण्यातील वाडिया महाविद्यालयात आणि पुणे विद्यापीठ येथे मानसशास्त्राचे अध्यापन. इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस (१९५९) आणि अखिल भारतीय दर्शन परिषद (१९६३) : मानसशास्त्रविभागाचे अध्यक्ष. अमेरिकेतील ड्यूक विद्यापीठात परामानसशास्त्रीय प्रयोगशाळेत काम (१९६३) मराठी विश्वकोश व मराठी तत्त्वज्ञान महाकोशाचे अभ्यागत संपादक. मानसशास्त्र, परामानसशास्त्र व तर्कशास्त्र या विषयांवर विपुल लेखन. १९९२ मध्ये *परामानसशास्त्र (अतींद्रिय मानस)* हा ग्रंथ प्रकाशित.

७. **प्रा. मोहन पाठक**

गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

# सुभाषित

१) बधिरयति कर्णविवरं वाचं मूकयति नयनमन्धयति।
विकृतयति गात्रयष्टिं संपद्रोगोऽयऽमद्भुतो लोके॥

२) लक्ष्म्या परिपूर्णोऽहं न भयं मेऽस्तीति मोहनिद्रैषा।
परिपूर्णस्यैवेन्दोर्भवति भयं सिंहिकासूनोः॥

३) ग्रहो कनकमाहात्म्यं वक्तुं केनापि शक्यते।
नामसाम्यादहो चित्रं धत्तूरोऽपि मदप्रदः॥

४) क्षते प्रहारा निपतन्त्यभीक्ष्णं
धनक्षये वर्धति जाठरोऽग्निः।
आपत्सु वैराणि समुद्भवन्ति
छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति॥

५) दातव्यं भोक्तव्यं सति विभवे संचयो न कर्तव्यः।
पश्येह मधुकरीणां संचितमर्थं हरन्त्यन्ये॥

६) प्रायेण धनिनामेव धनलोभो निरन्तरम्।
पश्य कोटिद्वयोपेतं लभाय प्रणतं धनुः॥

डॉ. मो. दि. पराडकर

संस्कृत सुभाषितात धनाची निन्दा आहे, धनिकांची प्रशंसाही आहे. ज्याप्रमाणे दारिद्र्याचे वावडे असणारी सुवचने आहेत त्याचप्रमाणे दानाची मोकळ्या मनाने स्तुती करणारी वचनेही सापडतात. संस्कृत सुवचनांच्या विषयांची विविधता फार वाखाणण्यासारखी आहे. त्याची वानगी दाखवणारी ही काही सुभाषिते.

१) सुरवातीची तिन्ही सुभाषिते धनवन्तांच्या ठिकाणी धनामुळेच कोणते दोष निर्माण होतात हे अगदी थोडक्यात सांगतात. पहिला श्लोक सांगतो, हा संपत्तीचा रोग जगात मोठा अद्भुतच म्हटला पाहिजे. हा रोग ज्याला जडला त्याचे वर्णन या श्लोकांच्या पहिल्या तीन ओळीत केले. कानाचे भोक बधिर करून टाकणे हे याचे पहिले लक्षण; म्हणजे दुसऱ्याचे बोलणे ऐकूनही न ऐकल्यासारखेच करणे; त्याच्याकडे लक्षच न देणे. पैसा जवळ असला म्हणजे मनुष्य या बाबतीत प्रवीण बनतो. गरजवंताचे बोलणे त्याला ऐकू येत नाही असे नव्हे, परंतु त्याच्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्याची कला ही व्याधी शिकवते. इतकेच नव्हे तर वाणीला मुकी बनवते. धनामुळे डोळ्यांपुढे अंधारी येते याचाही अनुभव आल्यावाचून राहत नाही. एवढ्यावरच हा धनरूपी रोग थांबत नाही तर याच्या प्रभावामुळे शरीरात (गात्रयष्टि) विकृतीही निर्माण होते म्हणजे धन असणारा माणूस गरजवंताला वेडावून दाखवतो, त्याच्या शब्दांची नक्कलही करतो. तसे पाहिले तर संपत्तीचा हा रोग एकच परंतु याची लक्षणे अनेक. दुसऱ्याचे बोलणे न ऐकल्यासारखे करणे, त्याच्याकडे दुर्लक्ष करणे, प्रसंगी त्याच्याशी अजिबात न बोलणे, त्याला वेडावणे (गात्रयष्टि विकृत करणे) या सर्व गोष्टी या व्याधीतूनच उद्भवतात ही वस्तुस्थिती आहे.

२) मी लक्ष्मीने म्हणजे संपत्तीने युक्त आहे माझ्यावर तिने कृपा केलेली आहे-मग मला कुणाची भीती? असा थाट कोणी करू नये कारण ही मोहनिद्राच आहे असे हा सूक्तिकार म्हणतो. किंबहुना भरपूर पैसा ज्याच्याजवळ आहे त्यालाच भीती जास्त असा अनुभव सध्याच्या जीवनात येतो. कारण एकच व ते म्हणजे लक्ष्मीची त्याच्यावरील कृपा. हे पटण्यासाठी पुढच्या ओळीत उदाहरण दिले. चन्द्र ज्या दिवशी परिपूर्ण म्हणजे सर्व कलांनी युक्त असतो त्याच वेळी राहू त्याच्या राशीला येऊन त्याला ग्रासतो. चंद्रास लागति कळा, उपराग येतो। गंगेसि भंग बहु पाणउतार होतो॥ या ओळीत या चंद्रग्रहणाकडे निर्देश आहे. सर्व कलांनी पूर्ण असलेल्या पौर्णिमेच्या चन्द्रालाच राहू ग्रासतो म्हणजेच लक्ष्मीची कृपा असणाऱ्याला धोका नाही असे मानणे ही भ्रामक कल्पना; हीच मोहनिद्रा.

३) या श्लोकात धनाची म्हणजे सोन्याची वर वर प्रशंसा करण्याच्या निमित्ताने वस्तुतः निन्दाच केलेली आहे. सुभाषितकार म्हणतो या सोन्याचे महत्व कोण बरे सांगू शकेल? कुणालाच सांगता येणार नाही हा भाव. दुसऱ्या ओळीत हा आशय प्रकट करताना श्लेषाचा उपयोग केलेला आहे. संस्कृतात धोत्र्याचे एक नाव 'कनक' आहे; याचे स्मरण करून म्हटले की धोत्र्यामुळे नशा येते, बेशुद्धी येते मग कनकामुळे (धनामुळे) मद येणे किंवा धुंदी चढणे

स्वाभाविकच नव्हे का? हाच अर्थ लक्षात घेऊन 'कनक' (सोने) आणि (धोत्रा) यांच्या नावात साम्य आले असावे. एकाने धुंद येते तर दुसऱ्यामुळे बेशुद्धीची प्रचीती येते.

४) या श्लोकांतली चौथी ओळ फारच प्रसिद्ध आहे. छिद्रे किंवा त्रुटी निर्माण झाल्या की अनर्थ बोकाळणारच हा सामान्य नियम. हा सिद्ध करण्यासाठी पहिल्या तीन ओळीत अनुभवाला येणारी व्यवहारातील तीन उदाहरणे दिली. एखादा व्रण किंवा जखम निर्माण झाली की साधारणपणे त्याच जखमेवर किंवा त्या व्रणावरच आघात होतात, मार बसतो. एखादे बोट कापले की ते आंधळे होते म्हणजे त्याच्यावरच प्रहार होतो असे म्हणतात या अर्थाने. दुसरे उदाहरण धनक्षय म्हणजे जवळ असलेली संपत्ती किंवा गाठी असलेला पैसा खर्च होऊन जाणे. आणि असे ज्या व्यक्तीचे होते त्याचाच जठराग्नी पेटू लागतो म्हणजेच तिला अधिक भूक लागते आणि भूक भागवण्याचे हुकमी साधन असलेला पैसा मात्र संपलेला असतो. 'भूक' हा शब्द व्यापक अर्थाने घेतला तर ही वस्तुस्थिती अधिकच जाणवते. अकिञ्चन माणसांना अनेक प्रकारची भूक असते. गरीब माणसांचा आहार जास्त असतो हेही सर्वांनाच माहीत आहे; आणि हा आहार प्राप्त करून घेणे मात्र साधनाभावी म्हणजे पैशाच्या अभावी कठीण होऊन बसते. तिसरे उदाहरण कोसळणाऱ्या आपत्तीचे किंवा संकटांचे. या आपत्ती कोसळत असतानाच वैरं निर्माण होतात कारण लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची शक्ती संकटांमुळेच क्षीण झालेली असते मग ज्यांच्या अपेक्षांचा भंग झालेला असतो ते वैरी बनतात. 'असतील शिते तर जमतील भुते' या म्हणीत निराळ्या अर्थाने हेच सांगितले . शिते असणे म्हणजे आपत्ती नसणे. मग मित्रांना काय तोटा? परंतु परिस्थिती बदलली म्हणजे ग्रह फिरले आणि संकटे येऊ लागली की कडवटपणा वाढतो आणि सुस्थितीत भोवताली असणारी माणसे पांगू लागतात. या सगळ्याला कारण एकच ते म्हणजे 'अनर्थ बोकाळति छिद्र होता' जहाजाला भोक पडले की पाणी आत येऊ लागते आणि जहाज बुडण्याचा धोका वाढतो आणि 'जलसमाधी' घेण्याची वेळ जवळ येते याचेही कारण 'छिद्रष्वनर्था बहुली भवन्ति'. 'बहुली भवन्ति' हे संस्कृतातील 'च्वि' रुप . बहुल म्हणजे पुष्कळ नसणाऱ्या गोष्टी पुष्कळ दिसू लागतात किंवा भासतात. प्रतिकारशक्ती कमी झाली की आजार बळावतो याचेही कारण हेच. या दृष्टीने हे सुभाषित म्हणजे जीवनात नेहमी येणारा अनुभव हे मान्य केले पाहिजे.

५) हा श्लोक दानप्रशंसेचा दातव्य म्हणजे देत असावे; भोक्तव्यं-उपभोग घेत रहावे. धन असले तरी सुद्धा संचय करू नये. हे कशावरून सांगता असे विचारले तर त्याला उद्देशून सूक्तिकाराने म्हटले. मधमाशांकडे बघ. त्या मध गोळा करतात परंतु त्यांना स्वतःला त्याचा उपयोग नसतो त्याचा लाभ पोवळी जपणारे लोकच घेतात. यावरून, साठवलेले धन दुसऱ्याच्या हाती जाते हे उघड आहे. म्हणून पहिल्या ओळीत सांगितले धन असले तरी संचय करण्याच्या फंदात न पडता ते दुसऱ्यांना द्यावे किंवा स्वतः भरपूर उपभोग घ्यावा हे चांगले.

६) हा श्लोकही अर्थाच्या दृष्टीने धनप्रशंसेचा आहे. धनाचा लोभ हा साधारणपणे धनिकांना किंवा धनवंतांना असतो. त्यांना सारखा पैसा हवा असतो. याला दृष्टांत देतांना श्लेषाचा मार्मिक उपयोग केला आहे. कोटि या शब्दाचे २ अर्थ १) संख्या २) टोक किंवा लक्ष्य म्हणजेच लाख आणि निशाण (बाण, गोळी वगैरेंचे लक्ष्य) जवळ दोन कोटी आहेत (कोटिद्वयं) तरी लक्षासाठी धडपड असतेच. धनुष्य तरी लक्ष्य वेधण्यासाठीच वाकवले जाते. म्हणजे लक्ष्यासाठी धडपड चालूच असते. 'लक्ष' हा शब्द हि द्व्यर्थी - याचा एक अर्थ लाख आणि दुसरा अर्थ लक्ष्य म्हणजे निशाण. यात भाय जवळ जरी पुष्कळ धन असले तरी इतरांना देण्यासाठी अधिकाधिक धनाची हांव असते.

•••

# भारतीय विद्या आणि पुरातत्त्व व कलेतिहास

**डॉ. अ. प्र. जामखेडकर**

*दि. २६, २७ व २९ डिसेंबर १९९७ रोजी ठाणे येथे आयोजित केलेल्या दुसऱ्या बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेच्या - अधिवेशन प्रसंगी 'इतिहास आणि पुरातत्त्व विद्या' या विभागाचे अध्यक्ष डॉ. अ. प्र. जामखेडकर यांचे अध्यक्षीय भाषण.*

ग्रह-नक्षत्र-ताऱ्यांनी रात्री भरगच्च झालेले आकाश, त्यानंतर पूर्वेला क्षितिजावर उगवणारे व सायंकाळी अस्ताचलावर विराजमान होणारे रविबिंब, रहाटगाडग्यासारखे नियमितपणे फिरणारे ऋतुचक्र, सभोवतालची चराचरात्मक सृष्टी, मानवी जीवनात, त्यातल्या त्यात भूतकाळात, घडलेल्या लक्षणीय घटना यांची मानवी मनाला पडणारी भुरळ आणि ओढ अगदी अनादि- काळापासून आहे. त्यामुळे, पूर्वी घडलेल्या अथवा भविष्यात घडणाऱ्या ठळक घटनांचा निर्देश म्हणजे पौराणिक भाषेत उत्पत्ती, स्थिती आणि लय, सर्ग व प्रतिसर्ग यांविषयीच्या मानवी मनाच्या प्रतिक्रिया नोंदविणे हा मानवी मनाचा नैसर्गिक खेळ आहे. प्रागैतिहासिक आणि आदिम जमातीतील मानव तसेच प्रत्येक धर्मातील संतमहात्मे, मंत्रद्रष्टे ऋषिमुनी पुराणकथांच्या माध्यमातून आपली अभिव्यक्ती करीत. आणि आपल्या पुराणांनी विश्वाची व सृष्टीची उत्पत्ती व आठ मन्वंतरे, प्रमुख राजवंशांची उत्पत्ती, चतुर्युगे आणि कलियुगातल्या राजवंशापर्यंत राजांच्या वंशावळ्या इत्यादींची सविस्तर माहिती दिली. आमच्या परंपरेनुसार महाभारत हे महाकाव्य इतिहासस्वरूप आहे. महाभारत व रामायणातल्या तसेच ब्राह्मणग्रंथांत निमित्तमात्रे उल्लेखिलेल्या घटना प्रत्यक्षात घडल्या अशी आमची धारणा आहे.

धार्मिक ग्रंथांतून आढळणाऱ्या, त्यातल्या त्यात प्रतीकात्मक भाषेत सांगितलेल्या, या माहितीबद्दल तार्किक अधिष्ठान असलेल्या आधुनिक शास्त्रांचा एक दृष्टिकोन आहे. पुराणकथांमधून वापरली जाणारी भाषा प्रतीकात्मक तशीच ती एकाच अनुभवावर व कालबिंदूवर केंद्रित असते. त्यामुळे आधुनिक इतिहासाला अभिप्रेत असलेल्या वर्तमान आणि भूत यांना, त्यातील घटनांना जोडणाऱ्या कार्यकारणात्मक विश्लेषणावर तपासून पाहण्याच्या कसोटीवर सगळ्याच पुराणकथा टिकत नाहीत. त्यामुळेच विश्वोत्पत्तीच्या संदर्भात ऋग्वेदातील पुरुषसूक्तात (पुरुषाच्या यज्ञातून सर्व विश्व उत्पन्न झाले), अथवा महाभारतात (प्रजापतीच्या २७ स्त्रियांपासून निरनिराळे मनुष्यवंश तसेच पशु, पक्षी इ. प्राणिमात्रांची उत्पत्ती झाली.) दिलेली उत्पत्ती तर्कपरीक्ष्य ऐतिहासिक घटना म्हणून पाहता येत नाहीत. तसेच पुराणातील चतुर्युगाच्या कल्पनेच्या संदर्भात अथवा जैनांच्या सुसम्म, सुसम्मा, सुसमा....दुसम, दुसमा इत्यादी युगकल्पनांच्या संदर्भात दिलेल्या मन्वंतरांचा, त्यातील विशिष्ट व्यक्तींच्या (उदाहरणार्थ तीर्थंकर) त्यांच्या आयुष्यमानाचे अथवा घटनाविशेषांचे वृत्तांत ऐतिहासिक चौकटीत अतिरंजित अथवा अविश्वास्य वाटतात.

जी गत भारतीय पुराणकथा अथवा वीरकथांतील वृत्तांतांची तीच काही अंशी युरोपीय आणि मध्य आशियाई भाषिकांना पूज्य असलेल्या जुन्या आणि नव्या करारातील वृत्तांताची. 'मनोरवसर्पण'च्या कथेत ज्याचे प्रतिबिंब आहे असे नोहाज आर्कचे चरविश्वाच्या उत्पत्तीसंबंधीचे कथानक, सर्व प्राणिविशेषांची उत्पत्ती एकसमयावच्छेदेकरून मूळच्या प्रत्येक प्रकारच्या एका जोडप्यापासून झाली आहे असे वर्णिते. या प्राण्यांच्या बरोबर किंबहुना त्या अगोदर मानव अस्तित्वात होता असेच या वृत्तांताला अभिप्रेत आहे. पश्चिम आशियाई धार्मिक परंपरेप्रमाणे, अथवा त्यावर आधारलेल्या तार्किक चिकित्सेप्रमाणे पृथ्वीवरील सृष्टीची उत्पत्ती सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी (इ.पू.४००४) एका रविवारी झाली. तर भारतीय परंपरेप्रमाणे युधिष्ठिराने आपला शक आजपासून पाच हजार वर्षांपूर्वी प्रस्थापित केला. या दोन्ही घटनांना तटस्थ तर्काधिष्ठित इतिहासाला अभिप्रेत असलेला समकालीन लिखित पुरावा नाही.

पुराणकथांना अभिप्रेत असलेला आणखी एक कालक्रमाधिष्ठित दृष्टिकोन म्हणजे निदान काही धार्मिक परंपरांत तरी (उदा. मध्य आशियाई व भारतीय) मानवाचा उत्तरोत्तर झालेला नैतिक अध:पात. भारतीय परंपरेप्रमाणे चक्रने- मिक्रमातील हा अध:पात परत पुढील युगात अत्यंत आदर्श अशा रागद्वेषरहित कल्पयुगात परिणत होऊन कालदोषामुळे परत त्याच अध:पतनात परिवर्तित होतो. मानवी जीवनातल्या घटना अशाच काल्चक्राच्या नियंत्रणाखाली असतात अशी आपली समजूत आहे. एवढेच नव्हे तर मानवी व इतर प्राणिमात्रांच्या जीवनातील चढउतार किंबहुना त्यांचे त्या स्वरूपातील अस्तित्व व्यापक कालचक्राच्या अंतर्गत कर्मसिद्धांताच्या नियमानुसार होते अशीही धारणा आहे.

वरील विवेचनावरून लक्षात येईल की, आपण वास्तव्य करतो ती पृथ्वी अथवा सभोवतालची सृष्टी यांमध्ये घडणारे बदल हे आदर्श मानवी आयुष्य, शक्ती, आकार तसेच नैतिक आचरण यादृष्टीने उत्तरोत्तर ऱ्हास दाखविणारे आहेत अशाच निर्णयाप्रत प्रतीकात्मक विचारसरणी आली. ॲडम आणि ईव्ह यांना स्वर्गातून हाकलण्यात आले, आणि तिथून मानवी जीवनाच्या शोकांतिकेला सुरुवात झाली असाच विचार पश्चिम आशियाई धार्मिक परंपरातून व्यक्त झाला आहे.

वरील पार्श्वभूमीवर इतिहास व त्यातल्या त्यात पुरातत्त्वाच्या अध्ययनाचा विकास युरोपात कसा झाला हे पाहणे मनोरंजक ठरेल. आणि या संदर्भात हे लक्षात घेणे आवश्यक आहे की पुराणकथेचा आणि भाषेचा उद्गम सारख्याच कार्यपद्धतीतून झालेला असला तरी भाषेच्या विकासात असा एक टप्पा आला की तेथून मानवाच्या ज्ञाननिष्पत्तीच्या प्रक्रियेत बदल घडला. तर्कावर आपल्या समजुती आणि धारणा पारखून, अधिक तटस्थ वृत्तीने आपल्या भोवतालचे जग, त्यातील घडामोडी, सृष्टीत घडणारे भौतिक बदल, त्यांचा मानवी व्यापारांवर होणारा परिणाम. या सर्वांमध्ये काही कालनिबद्ध अथवा ऐतिहासिक सूत्र आहे याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करणे यात तो बदल, इतिहास या ज्ञानशाखेपुरते बोलावयाचे झाल्यास, परिणत झाला. वेगळ्या शब्दात मध्ययुगानंतर युरोपात झालेल्या सांस्कृतिक

पुनरुज्जीवनानंतर ज्ञानाच्या क्षेत्रात घडलेल्या मोठ्या परिवर्तनामुळे मानवी स्थित्यंतरे जाणून घेण्याचा दृष्टिकोन बदलला. लिखित पुराव्याबरोबरच कलेतिहासात्मक व इतर भौतिक, म्हणजेच पुरावशेषांच्या सांस्कृतिक स्थित्यंतराचा अभ्यास तितकाच महत्त्वाचा आहे ही जाणीव प्रकर्षाने झाली. पुरावशेष हा विषय असलेल्या ज्ञानशाखेच्या कार्यपद्धतीत व परिणामस्वरूप तिच्या उद्दिष्टा-मध्ये काय महत्त्वाचे फरक घडून आले याचा आढावा घेणे आवश्यक आहे. तसेच या ज्ञानशाखेच्या उद्दिष्टांतील बदलामुळे प्राच्यविद्या अथवा भारतविद्येच्या संशोधनावर काय परिणाम झाले व अंगभूत संशोधनपद्धतीत कुठल्या प्रकारचे बदल करणे आवश्यक आहे किंवा होईल हे जाणून घेण्याचा या परिषदेच्या निमित्ताने मी प्रयत्न करीत आहे.

पुरातत्त्वाच्या भारतातील अभ्यासाचा आणि त्याच्या विकासाचा आढावा स्वतंत्रपणे निरनिराळ्या प्रसंगांच्या अनुषंगाने अथवा संदर्भात यापूर्वीही अनेक वेळा घेण्यात आला आहे. आणि त्यात काही वेगळी जास्त, माहितीची अथवा गुणात्मक, भर घालण्याच्या दृष्टीने मी हा प्रपंच करीत नाही. तशा प्रकारचे काही महत्त्वाचे योगदान करीन एवढा माझा अधिकार असल्याच्या भ्रमातही मी नाही. परंतु सारांशरूपाने पुरातत्त्वीय संशोधनात सातत्याने झालेले बदल लक्षात घेऊन भारतातील भविष्याच्या संशोधनाबद्दल मी बोलणार आहे.

पुरातत्त्वाच्या अभ्यासकाचे व ओढीचे मूळ, गूढ वाटणाऱ्या भूतकाळात आहे. आणि भूतकाळाविषयीचे ज्ञान अधिकाधिक प्रगल्भ होत गेले तरी नवनव्या यक्षप्रश्नांची भर पडत गेल्याने अभ्यासकाच्या अथवा सामान्य जिज्ञासूच्या मनातील ओढ कायम तशीच राहील असे वाटते. पुरातत्त्वीय संशोधनाच्या वाटचालीत सामान्यत: तीन टप्पे कल्पिता येतात. ते येणेप्रमाणे :

१. पुरावशेषांचा, त्यातल्या त्यात देखण्या कलात्मक वस्तूंचा संग्रह व
त्याकरिता प्रयत्न

२. पुरावशेषांचे वर्गीकरण व कालनिश्चिती, आणि त्यात अध्याहृत भौतिक
संस्कृतीच्या विकासाचे टप्पे

३. सांस्कृतिक बदलाच्या प्रक्रियेचा (Cultural Dynamics) अभ्यास

विलय पावलेल्या ग्रीक व रोमन संस्कृतींची युरोपातील सांस्कृतिक पुनरुज्जीवनात नव्याने ओळख झाली; आणि त्यातून भौतिक शास्त्रांची प्रगती झाली. ज्याप्रमाणे रोम व इतर प्राचीन शहरांतून संगमरवरी पुतळे व वास्तू उजेडात आल्या; तसेच प्रागैतिहासिक मानवाची हत्यारे व उपकरणे यांचेही ज्ञान झाले. थॉमसेन या डॅनिश संशोधकाने अशा संग्रहित हत्यारांचे वर्गीकरण केले आणि त्यातूनच त्रियुगा (पाषाण°, ताम्र° व लोहयुगा) ची कल्पना पुढे आली. तांबे आणि लोखंड गाळण्याचे कसब प्राचीन मानवाने मोठ्या प्रयत्नाने व अनुभवातून मिळविले असावे, आणि त्यामुळे सर्वप्रथम त्याची हत्यारे दगडाची असावीत व हळूहळू निसर्गातील अडचणींवर मात करीत त्याने आपली भौतिक प्रगती करून घेतली हे स्पष्ट झाले. भूकवचाच्या आणि भूगर्भाच्या संशोधनातून आताच्या भूकवचाची घडण स्तरवार झाली असून नदीकाठच्या निक्षेपात निरनिराळ्या स्तरात सापडणारी हाडे व हत्यारे

एकाच काळातील असावेत असं अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात, लक्षात आले. व त्याकाळी मानले जात असे त्याप्रमाणे, ५-६ हजार वर्षांच्या कालखंडात या घटना घडल्या असं मानणे सयुक्तिक ठरणार नाही हे प्राणिशास्त्रातील संशोधनाने लक्षात आले. याच सुमारास डार्विनने केलेल्या संशोधनामुळे भूतकाळात मानवी संस्कृतीत घडून आलेल्या बदलाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात क्रांतिकारक बदल घडून आला.

अठराव्या शतकात हळू हळू शास्त्रीय उत्खननाच्या तंत्रात प्रगती होऊन एक दीड शतकाच्या काळात मानवी संस्कृतीविषयीच्या ज्ञानात माहिती- रूपाने व गुणात्मक बरीच भर पडली. लिखित इतिहासाच्या पलिकडे मानवाचा इतिहास लाखो वर्षे असून ज्ञात इतिहास त्याच्या समोर लवमात्र आहे. प्रागितिहासा (Pre-History) बरोबरच इतिहासाच्या उप:कालासारखा असलेला संधिकाळ (Proto-Historic Period) हा मानवी प्रगतीच्या दृष्टीने तितकाच अर्थपूर्ण व महत्त्वाचा आहे, याची प्रकर्षाने जाणीव झाली. एरवी प्रतिकूल असणाऱ्या निसर्गावर माणसाने भौतिक हत्यार-उपकरणांच्या सहाय्याने मात केली. एवढेच नाही तर वेळोवेळी बदललेल्या हवामानानुरूप (कधी उबदार व अतिवृष्टीच्या, तर कधी अतिशीत व अनावृष्टीच्या) आणि पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांतील अनुकूल व प्रतिकूल परिस्थितीत बदलत्या तंत्रज्ञानानुसार यशस्वीपणे तोंड दिले. सारांश, इतिहासाच्या या नव्या जाणिवेमुळे संस्कृतीच्या इतर अंगांबरोबरच त्याच्या भौतिक प्रगतीचा व विकसित तंत्रज्ञानाचा उत्तरोत्तर उंचावणारा आलेखही सांस्कृतिक बदलांचे मूल्यमापन करताना समोर ठेवला पाहिजे हे लक्षात आले. मानवी संस्कृतीची प्रगती भटक्या जीवनातून (त्याच्या दोन प्राथमिक अवस्था भक्ष्यसंग्रह [Food gathering] व पशुपालन [Pastoral way]) अन्नोत्पादन व स्थिर जीवन (परत दोन अवस्था - शेतीप्रधान ग्रामीण जीवन व नागरीकरण) होताना अनेक सांस्कृतिक बदल झाले व त्याच्या जीवनयापनामध्ये आर्थिक, सामाजिक व राजकीय संस्थांच्या घटकांचे ग्रंथ अधिक गुंतागुंतीचे झाले हे ही स्पष्ट झाले. सांस्कृतिक बदल हे सभोवतालची नैसर्गिक व इतर परिस्थिती भूतलावर भिन्न असल्याने तसेच वेगवेगळ्या मानवी समूहांच्या सांस्कृतिक प्रेरणाही भिन्न असल्याने या प्रगतीचा आलेखही निरनिराळ्या खंडांत व उपखंडांत समांतर राहिला नाही. तसेच तो सारखा उंचावत जातोच असे नाही हे लक्षात आले. जर एखाद्या मानवी समाजाची प्रगती भटक्या जीवनाकडून स्थिर अथवा नागरी जीवनाकडे झाली आणि त्यात सांस्कृतिक संपर्कासारख्या बाह्य घटकांनी वेगळे वळण दिले नाही तर कुठले टप्पे साधारणपणे कुठल्या क्रमाने ओलांडावे लागतील हे स्पष्ट झाले.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मध्य आशिया, युरोप, भरतखंड, चीन आणि अमेरिका या खंडोपखंडात झालेल्या उत्खननांमुळे मानवी संस्कृतीचे वैविध्य लक्षात आले. नवाश्मयुगात घडलेली अन्नोत्पादनाची क्रांती व निरनिराळ्या खंडांत वेगवेगळ्या काळात झालेली नागरीकरणाची प्रक्रिया यांवर विचारमंथन झाले. उत्पादनाची साधने व त्यांचे स्वरूप, तसेच उत्पादकांचे गट आणि साधनांचे नियंत्रण करणारे गट यांतील अंतर्विरोधातून

हे बदल झाले असावेत असेही मत हिरोरीने मांडण्यात आले. ग्रामीण अवस्थेतून नागरीकरणापर्यंत जाताना अभिप्रेत असलेल्या आर्थिक, सामाजिक व्यवस्थेबरोबरच ग्रामकूट संस्थेकडून (Chiefdom) राजसंस्था व नंतर साम्राज्याच्या अथवा सार्वभौम राज्याच्या (Empire) संस्था कशा विकसित झाल्या हेही जाणून घेणे महत्त्वाचे ठरले. आणि त्यातूनच, पठडीच्या विचारसरणीतून पुरातत्त्वीय पुराव्याची ढकल करण्यापेक्षा त्याला नवीन व अधिक व्यापक वैचारिक बैठक दिली पाहिजे असा विचार मूळ धरू लागला. भौतिक शास्त्रांच्या प्रगतीबरोबरच पुरातत्त्वज्ञाला उपयोगी अशी नवीन वैज्ञानिक साधने विकसित झाल्याने पुरातत्त्वीय निरीक्षणे अधिकाधिक व्यापक व रेखीव होऊ लागली. कालमापनाच्या साधनांनी तर निरनिराळ्या सांस्कृतिक अवस्थांचे कालखंड अधिक अचूक झाले. पुरापर्यावरणशास्त्र, पुरावनस्पतिशास्त्र, पुराप्राणिशास्त्र, पुरावैद्यकशास्त्र तसेच हवाई छायाचित्रण, सामुद्री पुरातत्त्व या नवीन शाखेमुळे व इतर ज्ञानशाखांतील प्रगतीमुळे सांस्कृतिक बदलाचे सांगाडे भरीव आणि जिवंत झाले. आणि त्यामुळेच नुसत्या, काय आणि केव्हा घडले, यापेक्षा कसे व का घडले या प्रश्नांची उत्तरे पुरातत्त्वज्ञ देऊ लागले. भौतिक साधनांचे कार्य (function) काय याच बरोबर त्यांचा व्यापक सांस्कृतिक संदर्भ (structural) काय होता हे लक्षात घेतले नाही तर अभ्यास तोकडा ठरेल हे स्पष्ट झाले. उत्खनन फक्त किमती किंवा विपुल प्रमाणात पुरावशेष मिळविण्यासाठी नसून उत्खनन हाती घेताना नेमके कोणते प्रमेय तपासून पाहण्यासाठी ते हाती घेतले पाहिजे हे निकडीचे ठरले. आणि त्यातूनच विशिष्ट प्रश्नाने 'प्रेरित (problem oriented)' उत्खनन हाती घेण्याची प्रथा सुरू झाली. अनोख्या पुरातत्त्वीय स्थळाचा शोध घेण्यासाठी नाही तर समोर असलेल्या पुरातत्त्वीय प्रश्नाचा अथवा कोड्याचा सांगोपांग विचार करण्यासाठी गवेषण (exploration) करावयाचे हा विचार मूळ धरू लागला.

या पार्श्वभूमीवर भारतीय पुरातत्त्वाची वाटचाल कशी झाली याची कल्पना करणे फारसे अवघड नाही. युरोपात आणि विशेषत: ब्रिटनमध्ये जी वैचारिक परिवर्तने घडली त्यांचेच प्रतिसाद भारतात पडले हे स्पष्ट आहे. अलेक्झांडर कनिंगहॅमच्या नेतृत्वाखाली व नंतर जे गवेषण झाले त्या वेळी पुरातत्त्वाची वैचारिक बैठक बरीच पक्की झाली होती हे निखातनिधि अधिनियम (१८७८) व प्राचीन स्मारके अवशेष व स्थळे अधिनियम (१९०४) यांच्या पार्श्वभूमीवरून सहज लक्षात येते. समकालीन युरोपीय तंत्रांचा वापर करून सर जॉन मार्शल यांनी तक्षशिला, मोहेंजोदडो येथील उत्खनने केली. रा. ब. का. ना. दीक्षित, सर मॉर्टिमर व्हीलर यांनी अधिकाधिक प्रगत तंत्रे वापरली व त्यांचा प्रसार केला. स्वातंत्र्यपूर्वकाळात युरोपीय सांस्कृतिक श्रेष्ठतेच्या संकल्पनामुळे व सांस्कृतिक विकासाचा स्थूल आराखडा अद्याप स्पष्ट न झाल्याने, तसेच वैयक्तिक आवडीमुळे मध्य आशियाई व भूमध्य सामुद्री स्थळांशी जवळीक दाखविणाऱ्या स्थळांचीच मुख्यत्वे उत्खनने झाली. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र या प्रेरणा अधिक व्यापक झाल्याने प्रागैतिहासिक (Pre-historic) इतिहासपूर्वकालीन (Proto-historic) आणि ऐतिहासिक या स्थळांची उत्खनने, पुरातत्त्वाचा प्रसार विद्यापीठातूनही झाल्याने, अधिक व्यापक

प्रमाणावर झाली. ऐतिहासिक स्थळांच्या उत्खननावर काहीसा कमी भर असला तरी काही ठळक मध्ययुगीन स्थळांचीही उत्खनने हाती घेतली गेली. आज भारताचा पुरातत्त्वीय नकाशा बराचसा सम प्रमाणात भरला गेला आहे, आणि सांस्कृतिक विकासाचा आलेख स्थूलपणे पण बराचसा अखंडपणे ज्ञात आहे. राजस्थानमधील पुरापर्यावरणासंबंधीच्या संशोधनाने भारताच्या गेल्या काही लक्ष वर्षांच्या हवामानातील बदलाचा आराखडाही ज्ञात आहे. सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा व विशेषत: राजस्थान व गुजरात मधील सिंधुसंस्कृतीच्या मोठमोठ्या स्थळांचा शोध व उत्खनने, विभाजनानंतर हरप्पा, मोहेंजोदडो व चन्हुदडो ही प्रसिद्ध स्थळे सिंधपंजाबच्या प्रदेशाबरोबरच पाकिस्तानात समाविष्ट झाल्याने उर्वरित भारतात त्याची उणीव जाणवत होती ती भरून निघाली.

नवपुरातत्त्वाचे फलित काय? असा प्रश्न उपस्थित केला तर त्याचे बरेचसे समाधानकारक उत्तर आहे असे म्हणता येते. आज सिंधुसंस्कृतीच्या उद्‌गम, परिपोष आणि विलयाबाबत अधिक समाधानकारक उकल देता येते. सिंधु संस्कृती ही द्राविड असून भारताबाहेरील आक्रमक आर्य टोळ्यांनी त्या संस्कृतीचा नाश केला अशी ठाशीव युरोपीय मते आता कालबाह्य झाली आहेत. सिंधु लिपीचे गूढ अद्यापि उकलले नसले तरी या संस्कृतीच्या लोकांची भाषा कदाचित् भारो-युरोपीय समूहातली असू शकेल ही शक्यता, काही कर्मठ विचारवंत सोडल्यास, स्वीकारली जाते. सरस्वतीच्या खोऱ्यातील प्राचीन स्थळांची संख्या आणि तेथील समृद्धी यांचे, व निदान उत्तर सिंधुसंस्कृतीच्या अवस्थेचे स्पष्टीकरण, आर्यांच्या भारतातील अस्तित्वाशिवाय समर्थित होत नाही असा सर्वसामान्यतया स्वीकृत दृष्टिकोन झाला आहे. पर्यावरण व इतर भौतिक कारणांबरोबरच आंतरराष्ट्रीय व्यापारातील मंदी हेही सिंधुसंस्कृतीच्या लयाचे कारण होते आणि सिंधुसंस्कृतीच्या गुजरातमधील् विस्तारामागे निर्यातीच्या वस्तूंचे उत्पादन व आनुषंगिक वसाहतीकरण होते हेही ठामपणे मांडले जात आहे.

महाराष्ट्रातील सांस्कृतिक इतिहासात नवपुरातत्त्वामुळे पडलेली महत्वाची भर म्हणजे सावळदा, माळवा व जोर्वे या ताम्रपाषाणयुगीन व बृहदश्मयुगीन या दोन्ही सांस्कृतिक अवस्थांमधील बदलांचे इनामगाव व दायमाबाद येथील उत्खननांमुळे स्पष्ट झालेले चित्र. तितकीच महत्त्वाची येथील पुराव्याच्या आधाराने केलेली सांस्कृतिक बदलांची कारणमीमांसा. सर्वसाधारण ग्रामीण संस्कृतीची अप्रगत अवस्थेतून आर्थिकदृष्ट्या समृद्ध शेतीप्रधान अवस्थेत प्रगती व त्यातून पुनश्च रानटी अवस्थेत अपगती का झाली याचे पर्यावरणीय व भौतिक पुराव्याची सांगड घालून केलेले विश्लेषण नवपुरातत्त्वाची बैठक व तंत्र आत्मसात केल्याशिवाय शक्यच नव्हते.

भौतिक पुराव्याचे दुसरे महत्त्वाचे अंग म्हणजे कलेतिहास. काही वस्तू या उपयोगासाठी बनवल्या जातात, तसेच त्यांच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्याच्या दृष्टीनेही त्यांची निर्मिती होत असते. राजवाडा, देवालय, देवतेची मूर्ती अथवा रंगीत चित्र या दृष्टिगम्य अशा वस्तू वरील प्रकारच्या स्थापत्य[९], शिल्प[९] व चित्रकला या कलांच्या विषयात

मोडतात. प्राचीन भारतीय कलेतिहासातील या सर्वच शाखांचा परामर्श प्रस्तुतच्या भाषणात घ्यावयाचा विचार नाही. स्थापत्यकलेतील आणि त्यातल्या देवालय स्थापत्य अभ्यासा- संदर्भातील संशोधनाची दिशा गेल्या दीडशे वर्षांत काय होती आणि भविष्यात ती कशी असेल याचे थोडेसे चिंतन या निमित्ताने करावयाचे आहे.

भारताचे स्थापत्य मूळात विटा व लाकडी खांब आणि छत यांचे. आज त्यांचे प्राचीन काळातील फारसे नमुने शिल्लक नसले तरी उत्खननातून मिळालेला पुरावा त्याची प्राचीनता सिद्ध करण्याइतपत पुरेसा आहे. भारतातील सगळ्यात प्राचीन धार्मिक स्थापत्याचे नमुने स्तूपांच्या रूपाने उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातीलच प्राचीन उदाहरणे द्यावयाची झाल्यास नालासोपारा, पवनी, तेर आणि कोल्हापूर येथील सातवाहनकालीन स्तूपांची देता येतील. कार्ले- भाजे येथील गुंफांमधील चैत्यगृहे चटकन डोळ्यासमोर तत्कालीन देवालयांची उदाहरणे म्हणून येतात. त्यांची विटातील प्ररूपे म्हणून तेर येथील उत्खननात सापडलेली विटांची चैत्यगृहे म्हणून सांगता येतील. उत्तर भारतात मथुरा व तक्षशिला येथेही प्राचीन काळातील या विटांच्या देवालयांचे नमुने मिळालेले आहेत. आज जरी ही चैत्यगृहे पूर्णावस्थेत नसली तरी ती तेर येथील, काहीशा नंतरच्या, त्रिविक्रम मंदिरासारखी दिसत असावीत असे अनुमान करता येते. भाजे येथील प्राचीन चैत्यगृहात (इ.पू.२ रे शतक) अजूनही स्तूपावरील छत्री, आणि गजपृष्ठाकार छताला आधार देणाऱ्या कमानी लाकडाच्याच आहेत. स्थापत्यदृष्टीने त्यांचा प्रत्यक्ष काही उपयोग नसला तरी मूळच्या विटा-लाकडाच्या चैत्यगृहाचा आभास निर्माण व्हावा म्हणून त्या लाकडाच्या केल्या आहेत.

इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत लाकूड-विटातच देवालये बांधण्याची प्रथा लोकप्रिय होती. पण गुप्तकाळात शुष्कसंधीची (dry masonary) दगडी देवालये बांधण्याची प्रथा नव्याने सुरू झालेली दिसते. आणि यानंतरच्या काळात बहुसंख्य देवालये याच माध्यमात आणि तंत्राने बांधण्याची प्रथा पडली. ही देवालये पूर्वीच्या काळातील कुटी किंवा साध्या घराच्या आकाराची न राहता, बहुभूमिक शिखरे असलेल्या वास्तूच्या, म्हणजे राजवाड्याच्या अथवा प्रसादाच्या, आकाराची बांधली जाऊ लागली. गुप्तकाळात लोकप्रिय झालेली ही प्रथा भारतभर पसरत इ.स.च्या ७ व्या शतकानंतर त्यात मुख्यत: दक्षिणी (द्राविड) पद्धतीची व उत्तरेतील नागर पद्धतीची, असे दोन भेद आहेत. यापुढील काळात उत्तरेकडील नागर शिखराचेही आणखी दोन प्रकार : १) लतिन् व २) शिखर-शेखरी भेद झाले. नागराचाच कालिङ्ग हाही ओरिसातला वेगळा प्रादेशिक शिखरप्रकार त्या भागात रूढ झाला, तर द्राविड प्रकारची शिखरे थोड्या फार फरकाने, केरळ सोडता, सर्व दक्षिण भारतभर लोकप्रिय राहिली. इ.स.१० व्या - ११ व्या शतकात दक्खानमध्ये माळव्या-महाराष्ट्रात भूमिज प्रकारचे शिखर असलेली देवालये, तर उत्तर कर्नाटकात वेसर प्रकारची शिखरे असलेली देवालये बांधण्याची प्रथा रूढ झाली. वर उल्लेखिलेली दोन प्रकारची शिखरे ही अगोदर प्राय: उत्तरेत आणि दक्षिणेत प्रचलित असलेल्या नागर व द्राविड शैलीच्या शिखर व प्रासादभेदांच्या संगमातून उत्पन्न झाल्याचे दिसते.

वरील संदर्भात गेल्या दीडशे वर्षांतील संशोधनाचा विचार करणे मनोरंजक ठरेल. आपण याअगोदर हे पाहिले आहेच की गृह किंवा कुटीच्या आकाराची देवळे बांधण्याची प्रथा मागे पडून बहुभूमिक शिखरे असलेले प्रासाद बांधण्याची प्रथा नव्याने सुरू झाली. मूर्तिपूजा, आणि वेगळ्या आकाराची, १मंडप आणि गर्भगृहे वेगळी असलेली देवळे ही भारतबाह्य प्रेरणातून आलेली असावीत असा युरोपीय संशोधकांचा ग्रह झाला. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचे महानिदेशक अलेक्झांडर कनिंगहॅम यांनी तर गुप्तकालीन देवालयांना अगोदर सपाट शिखरे होती व नंतर शिखर बांधण्याची परंपरा सुरू झाली असे प्रतिपादिले. तर गुंफा-स्थापत्याचे विशेषज्ञ फर्ग्युसन यांनी असे प्रतिपादन केले की द्राविड शिखर (Dravidian) आणि नागर शिखर (Indo-Aryan) ही त्या त्या वंशाच्या परंपरांची निर्देशक असल्याने वेगवेगळी आहेत. आनन्द कुमारस्वामी व स्टेला क्रामरिश यांनी देवालयस्थापत्याचा सांगोपांग अभ्यास करून देवालयस्थापत्याच्या संशोधनाला स्थिर पायावर उभे केले. बौद्ध वाङ्मयातील स्थापत्यविषयक शब्दांचा व संज्ञांचा सखोल अभ्यास कुमारस्वामींनी केला, व सुरवातीचे बौद्ध स्थापत्य हे एतद्देशीय परंपरेतून आल्याचे सिद्ध केले. तर देवालय ही कल्पना वैदिक कर्मकाण्डात नसली तरी मूळ वैदिक कल्पनांतून भारतीय मंदिराची कल्पना साकार झाली हे वैदिक व आगम वाङ्मयाच्या सखोल अभ्यासाच्या सहाय्याने क्रामरिश यांनी सिद्ध केले.

भारतीय मंदिर हे अगोदरच्या देवगृह या सामान्य कल्पनेतून प्रासादात परिवर्तित झाले याचे मूळ राजा हा देवाचा अंश आहे या कल्पनेत आहे. देव हा प्रासादात राहतो ह्या नव्या कल्पनेचा स्वीकार झाल्यानंतर देवालयाचे बाह्यरूपच बदलले. प्रासादाप्रमाणेच गोपुर, बाह्यमण्डप, प्रतिहार यांचा अंतर्भाव झाल्यानंतर राजाच्या दिनक्रमासारखा देवाचा दिनक्रम झाला. त्याच्या आनन्दासाठी अंगभोग व रंगभोग आले; व शेवटी देवदासी ही संस्था सुद्धा मंदिराचा भाग झाली.

देवालय हे जसे त्याचे निवासस्थान म्हणून प्रासाद झाले, तसेच देवालय ही वास्तू त्याचे शरीर म्हटल्यानंतर त्यात वास करणारा देव सगुणब्रह्म असल्याने पर्यायाने देवालय हे विश्वरूप झाले. डॉ. देवांगना देसाई यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या खजुराहोवरील ग्रंथात देवालयावर अंकित केलेल्या देवप्रतिमांच्या सहाय्याने देवालय म्हणजे विश्व (cosmos) ही कल्पना १० व्या शतकात रूढ झाली हे स्पष्ट केले आहे.

हारवर्ड विद्यापीठातील भारतीय कलेचे प्राध्यापक डॉ. प्रमोद चन्द्र यांनी भारतीय कलेतिहाससंशोधनाचा परामर्श घेताना निखळ कलेतिहास लिहावयाचा झाला तर वास्तु° शिल्प° अथवा चित्रशैलीचाच आधार मानून संशोधन करण्याची गरज आग्रहाने प्रतिपादित केली आहे. युरोपीय कलेतिहासाचा प्रभाव अथवा चष्मा बाजूला सारून आवश्यक तितेच अभिलेखविद्यादी सहाय्यक ज्ञानशाखांचा वापर करून, पारंपारिक शिल्प शास्त्रांना वाट पुसत, आकृतिबंध (form) व त्याचा आशय यांच्यावरच आपले संशोधन मुख्यत: आधारले पाहिजे असे मत व्यक्त केले आहे.

भारतीय विद्येच्या संदर्भात वरील विवेचनाच्या

अनुषंगाने काही सांगण्यासारखे आहे. भारतीय विद्येच्या संशोधनाचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येईल की ह्या संशोधनाला सुरुवात झाली तौलनिक भाषाशास्त्रातून (comparative philology). संस्कृत भाषा आणि युरोपातील ग्रीक, लॅटीन व इतर युरोपीय भाषा यांमधील थक्क करून सोडणाऱ्या साम्यामुळे या संशोधनाला सुरुवात झाली. या प्राचीन भाषा त्या त्या प्रदेशातील आर्यांच्या धर्मभाषाही असल्याने तौलनिक दैवतशास्त्रात (comparative mythology) ते परिणत झाल्यास नवल नाही. आर्य संस्कृती जगातल्या विस्तृत भूप्रदेशावर पसरली असल्याने आर्यांच्या संस्कृतीच्या अध्ययनाबरोबरच त्या काळच्या पठडीप्रमाणे आर्यांचे मूळ वसतिस्थान या विषयावरही बरेच संशोधन झाले. पुरातत्वाच्या वाढत्या आकर्षणामुळे, तसेच आर्यसंस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननांमुळे या अभ्यासाला वेगळा आयाम मिळाला. भारतीय विद्येच्या ज्या निरनिराळ्या अंगांचा आज आपण अभ्यास करतो आहोत त्याला, मग तो इतिहास असो की साहित्य, धर्म असो की विज्ञान आणि तंत्रज्ञान, पुरातत्वाच्या माध्यमातून मिळालेल्या भौतिक पुराव्याने वेगळा जिवंतपणा लाभतो. उदाहरण द्यायचे झाल्यास आज उत्तर भारतात जी रामायण आणि महाभारतस्थलांची उत्खनने चालू आहेत त्यांतून भारतीय संस्कृतीचा जणू कणाच असलेल्या या महाकाव्यांच्या अभ्यासाला वेगळी धार लाभणार आहे. पुरातत्त्वीय संशोधनाची यापुढील दिशा नवपुरातत्त्वाचा हात धरून आक्रमायची आहे. नवपुरातत्त्वाला बहुआयामीय संशोधन अपेक्षित आहे. त्यात शास्त्रीय संशोधनात अपेक्षित असलेल्या प्रयोगाची, म्हणजे प्रमेयाची छाननी करण्याची, पद्धत जशी अपेक्षित आहे तसेच भाषाविज्ञान व मानववंशशास्त्र यांच्या अभ्यासाची जोडही आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीचा अधिक सखोल आणि सर्वस्पर्शी अभ्यास हे आपले लक्ष्य असेल तर आपल्या संशोधनात नवपुरातत्वाबरोबरच भाषाविज्ञान व भारतीय आदिम जमातींच्या अभ्यासाची जोड अत्यंत आवश्यक आहे.

❖ ❖ ❖

# वेदार्थ पद्धती - योग आणि यज्ञविधींचे स्थान

डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी

द. २६, २७ व २९ डिसेंबर १९९७ रोजी ठाणे येथे आयोजित केलेल्या दुसऱ्या बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेच्या - अधिवेशन प्रसंगी डॉ. त्रि. ना. धर्माधिकारी यांचे विशेष भाषण.

परंपरेने शक्य तेवढे प्रयत्न करून वेदांच्या शब्दांचे रक्षण केले. पदक्रमादी विकृतींमुळे वेदांच्या शब्दांचे स्वरांसह जतन झाले. पदक्रमादि विकृतिपाठ जगातील कोणत्याही अन्य वाङ्मयाला लाभला नाही. किंबहुना मौखिक पाठाची परंपरासुद्धा वेदांशिवाय किंवा वेदाङ्गांशिवाय अन्य साहित्याच्या वाट्याला आली नाही. शुद्ध मौखिक परंपरा आणि विकृति-पाठामुळेच अत्यंत प्राचीन वेद शुद्ध स्वरूपात स्वरांसह बहुंशी टिकू शकले. ज्या वेदांच्या मौखिक पाठपरंपरा नष्ट झाल्या ते वेद एक तर कालप्रवाहात नष्ट झाले, किंवा त्यांत स्वरांसह अनेक भ्रष्ट पाठ शिरले आणि ते फक्त लिखित स्वरूपातच शिल्लक राहिले.

वेदांच्या प्राचीनतेमुळे कधी कधी वेदमंत्रांचे अर्थ समाधानकारक लागू शकत नाहीत. काही वेदशाखांचा लोप झाल्याने त्यातील संदर्भांचे संभाव्य दुवे नष्ट झाले. ऋग्वेदातील काही सूक्तांच्या संदर्भात्मक पृष्ठभूमीसुद्धा उपलब्ध होऊ शकत नाहीत. क्वचित असे संदर्भ, अन्य शाखांत निर्दिष्ट इतिहासादिकांच्या साहाय्याने शोधावे लागतात. कधी कधी सूक्तांचे किंवा मंत्रांचे अनुक्रमणीसारख्या ग्रंथात निर्दिष्ट विनियोग, केवळ याज्ञिकी अर्थलापनाच्या आग्रहामुळे कृत्रिम असण्याचा संभवही नाकारता येत नाही. 'परोक्षप्रिया वै देवा:' या न्यायाने, मंत्रांचे गूढार्थ, वरवर दिसणाऱ्या अर्थांपेक्षा वेगळे असावेत अशी शंकाही येऊ लागते. विषयाच्या रूपकात्मक किंवा संकेतात्मक विवेचनाचे आकलन न झाल्याने सुद्धा अर्थप्रक्रियेत दुरूहता संभवते. काळाच्या ओघात वेदांतील काही शब्द व्यवहारात राहिले नसल्याने त्यांचे अर्थ उलगडत नाहीत.

वाणीचे अर्थ गूढ असू शकतात. वेदवाणी त्याला अपवाद कशी असेल? किंबहुना वेदवाणीस 'निण्या वचांसि' म्हणजे गूढ वाणी असे ऋग्वेदानेच (४.३.१६) संबोधले आहे.

अभ्यासकांची आकलनशक्तीसुद्धा भिन्न स्तरांवर असू शकते. कदाचित् याच अपेक्षेने वाणीच्या संदर्भात, ज्ञानसूक्तात 'उत त्व: पश्यन् न ददर्श वाचम् उत त्व: शृण्वन्न शृणोत्येनाम्' किंवा 'वाचं शुश्रुवान् अफलाम् अपुष्पाम्', अथवा 'यदीं शृणोत्यलकं शृणोति' किंवा 'अक्षण्वन्त: कर्णवन्त: सखाय: मनोजवेष्वसमा बभूवु:' याप्रमाणे उल्लेख आले असावेत.

वेदवाणीच्या अशा क्वचित अनाकलनीय अवस्थेतच 'इंटरप्रिटेशन' म्हणजे अर्थलापन पद्धतीचा उगम झाला असावा. वस्तुत: वेदांच्या संदर्भात 'इंटरप्रिटेशन' म्हणजे वैदिक ऋषींनी ज्या अभिप्रायाने आणि अर्थाने ऋचा रचल्या तो

अभिप्राय आणि अर्थ मंत्रांत शोधून काढणे होय. तथापि फार प्राचीन काळापासूनच, 'आपणांस अभिप्रेत असलेला, आपल्या रूचीचा, पूर्वग्रहयुक्त अर्थ ऋचांवर लादणे,' असा 'इंटरप्रिटेशन'चा अर्थ झाल्याचे दिसते.

अर्थलापन पद्धतीचा इतिहासही प्राचीन आणि मनोरंजक दिसतो. ऋग्वेदात 'ऊहब्रह्माणः' (१०.७१.८) हा शब्द 'वेदमंत्रांच्या अर्थाचा तर्क करणारे' या अर्थी वापरलेला असावा. निरुक्तकारांनी मंत्रार्थचिंतेसाठी तर्कासच ऋषी म्हणून संबोधिलेले दिसते. वस्तुतः ऋषींच्या मनोभूमिकेत प्रवेश केल्याशिवाय मंत्रांचा अर्थ समजणे कठीणच. कदाचित् तो तर्करूपी ऋषीच्या माध्यमातून प्राप्त होऊ शकतो. निरुक्तकार म्हणतात - 'अयं मन्त्रार्थचिन्ताऽभ्यूहः। अपि श्रुतितः, अपि तर्कतः। न तु पृथक्त्वेन मन्त्रा निर्वक्तव्याः। मनुष्या वै ऋषिषु उत्क्रामत्सु देवान् अब्रुवन् । को नः ऋषिर्भविष्यतीति । तेभ्यः एतं तर्कम् ऋषीं प्रायच्छन् । मन्त्रार्थचिन्ताभ्यूहम् अभ्यूहळम् । तस्मात् यदेव किंच अनूचानः अभ्यूहति आर्ष तत् भवति' (नि १३.१२)। ऋषी या लोकांतून निघून जात असतांना मनुष्य देवांना म्हणाले - आता आमचे ऋषी कोण असतील ? देवांनी तर्कालाच ऋषि म्हणून मनुष्यांना दिले. म्हणून अभ्यासक तर्काने जो अर्थ मांडतो तो जणू ऋषिप्रणीत होतो.

एवढे करूनही मंत्रांचा वास्तव अर्थ अल्पबुद्धींच्या हाती लागेलच असे नाही. ऋग्वेदानुक्रमणी म्हणते - 'ज्ञातेष्वपि पदार्थेषु वाक्यार्थपरिकल्पनम्। अशक्यम् ऋक्षु बह्वीषु नरैः अकृतबुद्धिभिः' (८.४.६) - म्हणजे पदांचा अर्थ समजला तरी अनेक ऋचांमध्ये वाक्यार्थाची संकल्पना करणे मंदबुद्धी माणसांना शक्य होत नाही.

बहुधा अशाच परिस्थितीत हताश होऊन कौत्साने 'वेदांना अर्थच नाही', 'अनर्थका वै वेदाः' असे म्हटले असावे. किंबहुना वेदार्थांच्या संबंधात कौत्साचे हे एक इंटरप्रिटेशनच असावे.

निरुक्तात वेदार्थ प्रबोधनाच्या संदर्भात, नैरुक्त, पारिव्राजिक, ऐतिहासिक, नैदान, याज्ञिक इत्यादी अर्थलापन प्रकारांचा संदर्भ बहुत्र आलेला आहे. त्यांचा संक्षेपाने निर्देश पुढील उदाहरणांवरून दिसून येईल.

'तत् कौ अश्विनौ? द्यावापृथिव्यौ इत्येके। अहोरात्रा इत्येके ।

सूर्याचन्द्रमसौ इत्येके । पुण्यकृतौ इत्यैतिहासिकाः।' (नि. १२.१)

'तत् को वृत्रः? मेघ इति नैरुक्ताः । त्वाष्ट्र आसुर इत्येतिहासिकाः'। (नि. २.१६)

'साम, ऋचा समं मेने इति नैदानाः'
(नि. ७.१२)

'स्यालः आसन्नः संयोगेन, इति नैदानाः'
(नि. ६.१)

'बहुप्रजाः निर्ऋतिमाविवेश' या मंत्रावर भाष्य करताना निरुक्तकार यास्काचार्य म्हणतात 'बहुप्रजाः कृच्छ्रमापद्यते इति परिव्राजकाः । वर्षकर्मेति नैरुक्ताः' (२.८)।

'अनुमतिः राकेति देवपत्न्यौ इति नैरुक्ताः। पौर्णमास्यौ इति याज्ञिकाः । सिनीवाली कुहूरिति देवपत्न्यौ इति नैरुक्ताः। अमावास्ये इति याज्ञिकाः' (नि. ११.२८, ३१)। इत्यादी.

सायणाचार्यांनी वेदांच्या अन्यान्य अर्थलापन पद्धतींचा आढावा घेतलेला दिसतो.
उदाहरणार्थ -

'चत्वारि वाक् परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः ।
गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ।।'
(ऋ. १.१६४.४५) या मंत्रावर भाष्य करताना सायणाचार्य -
'कानि तानि चत्वारि, इत्यत्र बहवः **स्वस्वमतानुरोधेन** बहुधा वर्णयन्ति' अशी प्रस्तावना करून पुढे म्हणतात -

१)'सर्ववैदिकवाग्जालस्य संग्रहरूपाः भूरादयस्तिस्र व्याहृतयः। प्रणव एकः इति केचन वेदवादिनो वदन्ति ।'

२)'अपरे व्याकरणमतानुसारिणः नामाख्यातनिपातोपसर्गभेदेन ... कृत्स्नाया वाचश्चतुर्धा व्याकृतत्वात्।'

३)'अन्ये तु याज्ञिकाः - मन्त्राः कल्पो ब्राह्मणं, चतुर्थी लौकिकीति।'

४)'ऋग्यजुःसामानि, चतुर्थी व्यावहारिकीति नैरुक्ताः।'

५)'सर्पाणां वाक् वयसां क्षुद्रसरीसृपस्य च, चतुर्थी व्यावहारिकीति ऐतिहासिकाः।'

६)'पशुषु तूणवेषु मृगेषु आत्मनि चेति आत्मवादिनः'

७)'अपरे मान्त्रिकाः (मातृकाः) प्रकारान्तरेण प्रतिपादयन्ति, परा पश्यन्ती मध्यमा वैखरीति।'

अशा सात मतांचा निर्देश करून सायणाचार्य निरुक्ताचा हवाला देऊन म्हणतात - 'लोकेषु पशुषु तुरीयम्। या पृथिव्यां साऽग्नौ सा रथन्तरे । याऽन्तरिक्षे सा वायौ सा वामदेव्ये । या दिवि साऽदित्ये सा बृहति सा स्तनयित्नौ । अथ पशुषु। ततो या वागत्यरिच्यत तां ब्राह्मणेष्वदधुः' (नि.१३.९) इति ।

याच प्रमाणे -

'चत्वारि शृङ्गा त्रयो अस्य पादाः द्वे शीर्षे सप्त हस्तासो अस्य । त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्यां अविवेश' ।। (ऋ ४.५८.३) यावरील सायणाचार्यांचे व्याख्यान देखील अनेक-मत प्रतिपादक दिसते - सायणाचार्य म्हणतात -

'यद्यपि अग्निसूर्यादिपञ्चदेवतात्मकत्वात् पञ्चधाऽयं मन्त्रः व्याख्येयः, तथापि निरुक्ताद्युक्तनीत्या यज्ञात्मकाग्नेः, सूर्यस्य च प्रकाशकत्वेन तत्परतया व्याख्यायते' ।

त्यांच्या अग्निपर व्याख्येनुसार - चार शृंगे, म्हणजे चार वेद, तीन पाद म्हणजे तीन सवने, द्वे शीर्षे म्हणजे ब्रह्मौदन आणि प्रवर्ग्य, सप्त हस्तासः म्हणजे सात छन्द, त्रिधा बद्ध म्हणजे मंत्र-ब्राह्मणकल्परूपांनी तीन प्रकारे बद्ध.

सूर्यपक्षाच्या व्याख्येनुसार - चार शृङ्गे म्हणजे चार दिशा, तीन पाद हे तीन वेदच. द्वे शीर्षे

म्हणजे दिवस आणि रात्र, सप्त हस्तास: म्हणजे सात रश्मी, त्रिधा बद्ध म्हणजे पृथिवी अन्तरिक्ष आणि द्युस्थानी बद्ध, इत्यादी.

त्याचप्रमाणे 'एकया प्रतिधाऽपिबत् साकं सरांसि त्रिंशतम् । इंद्र: सोमस्य काणुका' (ऋ. ८.७७.४) या मंत्रावरील सायणभाष्य याज्ञिकांच्या आणि नैरुक्तांच्या मतांचा निर्देश करतात.

हे सर्व अर्थ **'स्वस्वमतानुरोधेन'** केले असल्याचे सायणाचार्यांनी नमूद केले आहे. वस्तुत: आपणांस त्या मंत्रकर्त्याला अभिप्रेत असलेला अर्थ शोधून काढणे हेच अभिप्रेत असावयास हवे. **'स्वस्वमतानुरोधेन'** ऋचांचे अर्थ लावणे हे बुद्धिकौशल्याचे किंवा प्रतिभेचेही द्योतक असेल. पण त्यामुळे संशोधकास अभिप्रेत असलेला सत्याचा शोध घेता येणार नाही.

वेदांचे अर्थ आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक संभवू शकतात असे निरुक्तकारांनी सूचित केले आहे. उपनिषदातही 'इत्यधिदैवतम्, अथ अध्यात्मम् (केन उप ३.४.४, ५) असे निर्देश आल्याचे दिसतात. हे सर्व अर्थलापनाचे, इंटरप्रिटेशनचेच प्रकार समजावयास हवेत.

जगन्नाथ वेदालंकार यांनी 'वेद का अर्थ' या पुस्तिकेत योगी अरविंदांच्या व्याख्यापद्धतीचे विवेचन केले आहे. ते म्हणतात 'योगी अरविंदांचा दृष्टिकोन त्यांच्या प्रत्यक्ष आत्मानुभवावर आधारित आहे. त्यांच्या अंत:करणात वेदांचा जो गुह्य अर्थ प्रकट झाला तो त्यांच्या स्वानुभवाच्या पृष्ठभूमीवर आधारलेला आहे. आध्यात्मिक आधिदैविक आणि आधिभौतिक व्याख्यापद्धतींपैकी योगी अरविंद पहिल्या व्याख्यापद्धतीस, म्हणजेच आध्यात्मिक, मनोवैज्ञानिक, आंतरिक म्हणजेच योगसंबद्ध व्याख्यापद्धतीस अधिक महत्त्व देतात. आणि या व्याख्यापद्धतीने प्राप्त अर्थ, वेदांचा खरा अभिप्राय किंवा सारभूत अर्थ मानतात.'

वेदालंकार पुढे म्हणतात, 'या तीन पद्धतींपेक्षा चौथी व्याख्यापद्धती युरोपीय विद्वानांनी प्रवर्तित केली आहे. ते वेदांचा केवळ बौद्धिक दृष्टीने विचार करतात आणि वेदांचे विवेचन ऐतिहासिक, तुलनात्मक धर्म, भाषाविज्ञान, दैवतशास्त्र इत्यादींच्या साहाय्याने करतात. कर्मकाण्डीय व्याख्या पद्धती वेदांचा बाह्यार्थ दाखवू शकेल. युरोपीय विद्वानांनी आविष्कृत, बाह्य प्रकृतीसंबंधी अर्थ आपल्या सामान्य परिकल्पनेत स्वीकारता येईल. परंतु त्याही पलीकडे वेदांचा वास्तविक आणि रहस्यमय अर्थ असतो. हा अर्थ ज्ञानप्रबुद्ध आत्म्यास प्रतीत होतो.'

वेद हे कर्मकाण्डात्मक आणि ज्ञानकाण्डात्मक असल्यामुळे यज्ञ आणि ज्ञान हे वेदांचे परस्परसंबद्ध विषय आहेत. ज्ञानकर्मसमुच्चयपक्षात या दोहोंची फारकत करता येणार नाही.

यज्ञधर्म सुद्धा काळ आणि लोक या वैश्विक तत्त्वांशी नित्य संबद्ध असलेला दिसतो. यज्ञ हा ऋताचा म्हणजे विश्वसंचालनाच्या नियमांचा प्रज्ञापक असून सत्याकडे म्हणजे परम सत्याकडे घेऊन जाणारा राजमार्ग आहे. यज्ञ म्हणजे परियद् देवचक्रच आहे (ऐब्रा ४.१५). नित्य वैदिक यज्ञ विश्वचिन्तनाच्या प्रेरणेतून उगम पावलेले दिसतात. सृष्टीच्या सतत क्रियाशील उत्पत्तिविद्येस आणि

रहस्यमय प्रक्रियेस जाणण्याचे, यज्ञ हे प्रतीकात्मक साधन आहे. 'मनुर्वा अग्रे यज्ञनेजे तदनुकृत्य इमाः प्रजा यजन्ते (शब्रा १.५.१७) किंवा 'अथैनमात्मनः प्रतिमामसृजत यद् यज्ञः। तस्मादाहुः प्रजापतिर्यज्ञ इति' इत्यादी वाक्ये यज्ञाची मूलभूत संकल्पना स्पष्ट करतात. या वैश्विक यज्ञधर्मांच्या साक्षात्कारामुळे ऋषींना साक्षात्कृतधर्माणः असे म्हटले जाते. शबर स्वामी यज्ञधर्माची व्याख्या करताना - 'यः पुरुषं निःश्रेयसेन संयुनक्ति स धर्मशब्देनोच्यते,' असे सांगून यज्ञधर्माची सांगड निःश्रेयसाशीच घालतांना दिसतात. योगी अरविंदांनी सुद्धा - 'The whole process of the universe is in its very nature a sacrifice' (Guide to Upanisads - P.104) असे वैश्विक यज्ञाचे विवेचन केलेले दिसते.

या विवेचनाचा अभिप्राय असा की अरविंदांना अभिप्रेत असलेला योग आणि वैश्विक यज्ञ यांच्या साहाय्यानेही वेदार्थ स्पष्ट होऊ शकेल. येथे पुनः हे लक्षांत ठेवले पाहिजे की कर्मकाण्डातील यज्ञ हा वैश्विक यज्ञाचे प्रतीक असून त्याद्वारा वैश्विक यज्ञ समजून घेऊन वेदव्याख्यान करावयास हवे.

ब्राह्मण, कल्पसूत्रे व प्रयोग हे ग्रंथ प्रतीकात्मक यज्ञप्रक्रियांच्या तंत्राचे विवेचन करतात. त्या यज्ञतंत्रातही वैश्विक यज्ञ कसा अन्तर्निहित आहे हे देखील पहावयास हवे. त्यासाठी प्रयोगात्मक यज्ञतंत्रांच्या परंपरा तपासून पहाव्या लागतील. त्यापूर्वी योग आणि यज्ञ यांतील योगांचे संदर्भात वेदार्थाचा विचार करू.

ऋग्वेदांत सोमाची स्तुती करीत असतांना ऋषी म्हणतात - 'यत्रानन्दाश्च मोदाश्च मुदः प्रमुद आसते। कामस्य यत्राप्ताः कामाः तत्र माममृतं कृधि। इन्द्रायेन्दो परिस्रव'। (९.११३.११). अर्थात् जेथे आनंद मोद मुद प्रमुद नित्य निवास करतात,

परियद् वा एतद्देवचक्रं यदभिप्लवः षडहः ।
यज्ञो वै ऋतस्य योनि : ।
यज्ञो वै ऋतस्य पन्थाः ।

जेथे इच्छांच्या देखील इच्छा पूर्ण होऊन त्या आप्तकाम होतात, तेथे मला अमृतमय कर. इंद्रासाठी हे सोमा तू पाझर'. हा मंत्र भौतिक सोमरसाला लागू होईल का? योगावस्थेमध्ये भ्रूमध्यातून पाझरणाऱ्या अमृतमय स्रावाचा हा निर्देशक असेल का?

'सोमं मन्यते पपिवान् यत् संपिंषन्त्योपधिम्।
सोमं यं ब्रह्माणो विदुः न तस्याश्नाति कश्चन।।
आच्छिद्विधानैर्गुपितो बार्हतैः सोम रक्षितः ।
ग्राव्णामिच्छृण्वन् तिष्ठसि न ते अश्नाति
पार्थिवः' ।। (ऋ. १०.८५.३/४)

या मंत्रातही, ब्रह्मविद्येचे उपासकच सोम म्हणजे काय ते जाणतात. तो सोम कुणी (सामान्य ऋत्विज्) पिऊ शकत नाही. कारण सोम आच्छिद्विधान- रूपी बार्हतसामाच्या रहस्यांत गुढ स्वरूपात स्थित आहे. कुणी मर्त्य व्यक्ती तो सोम पिऊ शकत नाही असे म्हटलेले दिसते. येथे 'बृहत् साम तथा साम्नां' या गीतोक्त पारमेश्वरी विभूतीचे स्मरण होते.

लवसूक्तांतील (१०.११९.७,९,११)
'न हि मे रोदसी उभे अन्यं पक्षं चन प्रति ।
कुवित्सोमस्यापामिति ।

हन्ताहं पृथिवीमिमं नि दधानीह वेह वा ।
दिवि मे अन्यः पक्षोऽधो अन्यमचीकृपम्'।

इत्यादी मंत्र समाधि अवस्थेतील सतरावियेचे स्तन्य प्राशन करणाऱ्या ऋषींच्या संदर्भात पाहिल्यास त्यांचा उचित अर्थ प्रतीत होईल. सोमवल्लीच्या रसास सुरा समजून, त्याच्या प्राशनाने शुद्ध गमावून बसलेल्या इंद्राचा संदर्भ येथे घेतला तर - 'तुका आकाशाएवढा', किंवा 'मुंगी उडाली आकाशी' येथील अर्थाचाही अनर्थ होईल.

वेदांच्या यज्ञपर व्याख्यानाबाबत आता विचार केला पाहिजे. वेदांवरील सर्व पारंपरिक भाष्ये वेदांचा यज्ञपर अर्थ लावताना दिसतात. क्वचित भाष्ये सांप्रदायिक असली तरी त्यांची यज्ञपरता सुटत नाही.

वेद आणि तेराव्या शतकातील भट्टभास्कर मिश्र यांत कमीत कमी अडीच हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालाचे अंतर आहे. त्यामुळे या भाष्यकारांना सुद्धा भाष्य लिहितांना खूपच अडचणी आल्या असतील. एवढ्या प्रदीर्घ कालावधीत अर्थप्रक्रियेस आवश्यक ठरणारे अनेक सांधे वा दुवे निखळले असणे शक्य आहे. वेदार्थाच्या पृष्ठभूमीचे अनेक अलिखित संदर्भ विस्मृतीत गेले असतील.

हे खरे की चौदाव्या शतकातील सायणाचार्यांच्या भाष्याच्या समर्थ रचनेमुळे त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या वेदव्याख्या नष्ट झाल्या. भट्टभास्करांचे तैत्तिरीय भाषेवरील भाष्य तेवढे त्रुटित किंवा संकोचरूपाने शिल्लक राहिले.

सायणाचार्यांनी आपल्या ऋग्वेदभाष्यात भट्टभास्करांचा निर्देश केलेला आहे. तैत्तिरीयावरील भट्टभास्करभाष्याच्या काही हस्तलिखितांत 'भाष्यसंकोच' म्हणून या भाष्याचा निर्देश केलेला आहे. या भाष्यास क्वचित 'वृत्ती' असेही म्हटले आहे. भट्टभास्कराचार्यांनीही बौधायन श्रौतसूत्रावरील भवस्वामींच्या भाष्याचा 'भवस्वाम्यादिभाष्याण्यहो' असा निर्देश करून त्यांचे ऋण मान्य केले आहे. आठव्या शतकातील भवस्वामींनीही आपल्या भाष्यात पूर्वसूरींचा 'अन्ये', 'केचित्' या स्वरूपात उल्लेख केला आहे. ही भाष्ये आज उपलब्ध नाहीत. तथापि या भाष्यांच्या परंपरा ब्राह्मणादी ग्रंथ आणि निघंटु, निरुक्त यांसारख्या वेदांवरील भाष्य ग्रंथाच्या जवळपास पोचण्याची शक्यता आहे. ब्राह्मणग्रंथ वेदांचे यज्ञपरच प्रतिपादन करतात. क्वचित शब्दांच्या व्युत्पत्तींचा मागोवा घेत यास्काचार्यांच्या निरुक्ताची बैठक घालून देतात. उपनिषदांचा ज्ञान व उपासना हा विषय आहे. काम्ययज्ञाच्या संबंधात मुंडकोपनिषद् (१.२.७). 'प्लवा ह्येते अदृढा: यज्ञरूपा:' असा निर्देश करते. तथापि नित्य यज्ञांचा मात्र 'मन्त्रेषु कर्माणि कवयो यान्य पश्यन् तानि त्रेतायां बहुधा संततानि । तान्याचरथ नियतं सत्यकामा: एष व: पन्था: सुकृतस्य लोके' (मुं.उ. १.२.१) या मंत्राने पुरस्कारच करतात. छांदोग्यादी काही उपनिषदांत तर यज्ञप्रक्रियेतील सामगान प्रकारांचेही सविस्तर संदर्भ आलेले दिसतात. ज्ञानकांडात्मक उपनिषदांतही नित्य यज्ञाच्या विरोधी वातावरण आढळत नाही. ईशावास्य किंवा बृहदारण्यक उपनिषदांचा तर क्रमाने संहितेत आणि ब्राह्मण ग्रंथातच समावेश केलेला आहे. तैत्तिरीय उपनिषदांवर (८.२) भाष्य करतांना

सायणाचार्य - 'वेदो हि मन्त्रब्राह्मण- रूपेण द्विविधः। तन्त्र इयं ब्रह्मवल्ली ब्राह्मणरूपा' असे म्हणून उपनिषदांचाही ब्राह्मणग्रंथातच अंतर्भाव करतात. आरण्यकेही अर्थातच ब्राह्मणातच अंतर्भूत होतात.

वेदाङ्गांपैकी कल्पसूत्रे, विशेषत: श्रौतसूत्रे, संहिताब्राह्मणांवर आधारलेल्या यज्ञांचेच विवेचन करतात. लगधकृत वेदांगज्योतिष हा लघुग्रंथसुद्धा, ज्योतिषासंबंधी असला तरीही - 'वेदा हि यज्ञार्थम् अभिप्रवृत्ताः' असे सांगून यज्ञसंबंधात कालज्ञापनासाठी त्या ग्रंथाचा उपयोग विशद करतो. शिक्षा, प्रातिशाख्ये, व्याकरण, छंदस् इत्यादी वेदांगे सुद्धा आपापल्या विषयानुसार वैदिक प्रक्रियांचे विवेचन करतात.

वैदिक संहितांपैकी यजुर्वेद आणि सामवेद याज्ञिकी संहिता म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यामुळे त्यांच्या ब्राह्मण ग्रंथांनी त्या संहितामंत्रांचा यज्ञपर विनियोग सांगून त्यांचा अर्थ लावणे स्वाभाविकच आहे. ऋग्वेद किंवा अथर्ववेद संहिता याज्ञिकी संहिता म्हणून ओळखल्या जात नाहीत. तरीही त्यांच्या ब्राह्मणांनी त्या त्या संहितांचे विनियोग व अर्थ यज्ञपरच लावलेले दिसतात.

ऋग्वेदाचे संकलन आणि रचना प्रामुख्याने कुलमंडलाच्या आणि मंडलादि परिभाषेच्या दृष्टिकोनातून केलेली आहे. याज्ञिकी संहितांप्रमाणे ती यज्ञीय कर्मास अनुसरून केलेली नाही. ऋग्वेदात भिक्षुसूक्त, ज्ञानसूक्त, संज्ञानसूक्त, अक्षसूक्त, अरण्यानीसूक्त, काही संवादसूक्ते, अशा अनेक सूक्तांचा यज्ञाशी साक्षात् संबंध दिसत नाही. नासदीय सूक्तासारख्या तत्वज्ञानात्मक सूक्तांचाही ऋग्वेदात समावेश आहे. ऋग्वेदातील अनेक सूक्तांचा विनियोग ब्राह्मणग्रंथात किंवा श्रौतसूत्रात उपलब्ध होत नसल्याने, अशा सूक्तांच्या संबंधात 'लैङ्गिको विनियोगः' असे भाष्यकारांनी म्हटलेले आहे.

इतके असूनही ऋग्वेदाचाही विषय बहंशी यज्ञ असाच आहे हे निर्विवाद. त्यासाठी प्रमाणे देण्याची गरज नाही. यजुर्वेद किंवा ब्राह्मणग्रंथातील यज्ञविधी इतका ऋग्वेदीय यज्ञ प्रौढ आणि प्रगल्भ नसेलही. ऋग्वेदात तो विकसनशील असून त्याचे स्वरूप काहीसे भिन्न असण्याची शक्यता आहे. तरीही अनंतरकालीन यज्ञविधींशी ऋग्वेदीय यज्ञांची सुसंगती दिसून येतेच. 'ऋचां त्वः पोषमास्ते पुपुष्वान् गायत्रं त्वो गायति शक्वरीषु। ब्रह्मा त्वो वदति जातविद्यां यज्ञस्य मात्रां विमिमीत उ त्वः' (१०.७१.११) या मंत्राने ऋत्विक् कर्मांची केलेली विभागणी यज्ञामध्ये तशीच स्वीकारलेली दिसते.

अथर्ववेदात शांति, पौष्टिक, आभिचारिक, भैषज्य सूक्तांचा अंतर्भाव आहे. तथापि सोमादियज्ञात, ब्रह्मगणातील ऋत्विजांसाठी आवश्यक मंत्रांचा संग्रह, ऋग्वेदातून उसनवारी करून, केल्यानंतर अथर्ववेदास वेद म्हणून मान्यता मिळाली. अथर्ववेदाचा यज्ञाशी असा अंशात्मक तरी संबंध आढळतोच.

अशा रीतीने चारही वेदांचा, त्यांच्या उपशाखांसह यज्ञाशी संबंध असल्याने, या ग्रंथांचा परंपरेने, यज्ञपर अर्थ लावण्याचा केलेला प्रयत्न सर्वत्रच कृत्रिम असण्याचा संभव नाही.

मंत्र, ब्राह्मण श्रोतसूत्रे, व प्रयोग किंवा पद्धति ग्रंथ हे श्रौतवाङ्मयातील चार टप्पे दिसतात. प्रत्येक पुढील टप्पा, अगोदरच्या टप्प्यावर आधारलेला असून या चारही टप्प्यांत एक अनुस्यूत संबंध दिसून येतो.

वाराणसी येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय प्राच्य विद्या परिषदेच्या चोविसाव्या अधिवेशनाच्या वेदविभागीय अध्यक्षीय भाषणात (सन १९६८) डॉ. काशीकर म्हणतात - one can not unlock the secrets of the Vedic Minds unless he uses the key of knowledge of sacrificial rituals" यज्ञीय विधींची किल्ली वापरल्याशिवाय वैदिक ऋषींच्या मनातील गूढ गुपितांची कुलुपे कुणी उघडू शकणार नाही.

हेच मत डॉ. काशीकरांनी त्यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या Ritualistic Studies, a retrospect and prospect या लेखात मांडलेले दिसते. या लेखात ते म्हणतात - 'The Veda cannot be truly understood unless adequate attention is paid among other things to the rituals prescribed and described therein' अन्य वेदार्थ प्रक्रियां-बरोबरच, वेदात विहित आणि वर्णित यज्ञविधींकडे पुरेसे लक्ष दिल्याशिवाय वेदांचा अर्थ खरोखरी कळणे शक्य होणार नाही. (हा लेख - Some aspects of Vedic Studies - संपादक - समीरण चंद्र चक्रवर्ती, प्रकाशक - रवींद्र भारती विश्वविद्यालय, कलकत्ता १९९६ येथे प्रसिद्ध झाला आहे)

श्रौतयज्ञविधी व्यवहारातून बहुंशी परास्त झाल्यामुळे, प्रात्यक्षिकाअभावी क्लिष्ट स्वरूपाचा झाला आहे. दुसरे असे की, मंत्र आणि त्यावरील ब्राह्मण हे त्या त्या यज्ञविधीचे संपूर्ण आणि सम्यक चित्र डोळ्यांसमोर उभे करू शकत नाही. म्हणूनच नंतर आध्वर्यव हौत्र औद्‌गात्र आणि ब्रह्मत्व यासंबंधींची त्या त्या शाखेची श्रौतसूत्रे निर्माण झाली. कालांतराने ती देखील, त्यांच्या संक्षिप्त स्वरूपामुळे समग्र प्रयोग समजवून देण्यास अपुरी पडू लागल्याने प्रयोग ग्रंथ आणि पद्धती निर्माण झाल्या.

डॉ. काशीकर यांनी श्रौतकोश (इंग्रजी विभाग, भाग १, पान ७) या ग्रंथाच्या प्रस्तावनेत, हिलेब्रांट यांचे नमूद केलेले मत लक्षणीय आहे, ते असे 'Some sort of Prayogas must have been in vogue, even before the compilation of the srauta sutras proper' (श्रौतसूत्राच्या रचनेपूर्वीही, काही तरी स्वरूपात प्रयोग ग्रंथ प्रचारात असावेत). अर्थात् हे प्रयोगग्रंथ आज उपलब्ध नाहीत.

याच प्रस्तावनेत डॉ. काशीकर यांनी ईगलिंग यांचे मत उद्‌धृत केले आहे ते असे - 'The performance of sacrifice was taught as a practical art and that the theoritical instruction supplied by the Brahmanas was conveyed orally in connection with such practical performances' यज्ञविधीचे शिक्षण प्रात्यक्षिक स्वरूपात दिले जात होते आणि अशा प्रात्यक्षिकांसंबंधी ब्राह्मणग्रंथातील सैद्धांतिक विवेचनाचे पाठ मौखिक स्वरूपात दिले जात होते. येथे डॉ. काशीकरांनी असेही मत मांडलेले दिसते की काही स्वरूपात श्रोतप्रयोगांच्या लिखित पुस्तकांच्या अस्तित्वाची दखल श्रौतसूत्रकारांनीही घेतली असावी.

एवढ्या प्रपंचावरून आपल्या असे लक्षात येईल की, यज्ञ-कर्माचे समग्र स्वरूप लक्षात येण्यासाठी, संहिता ब्राह्मणे कल्पसूत्रे आणि प्रयोगग्रंथ यांची आवश्यकता उत्तरोत्तर वाढत गेलेली आहे.

बौधायन श्रौतसूत्राने (२४.१), यज्ञविधीच्या ज्ञानाच्या साधनांचा ऊहापोह करतांना म्हटले आहे - 'पञ्चतयेन कल्पमवेक्षेत, छन्दसा, ब्राह्मणेन, प्रत्ययेन, न्यायेन, संस्थावशेन इति । यच्छन्दसा न शक्नुयात् कल्पयितुं ब्राह्मणेन तत् चिकल्पयिषेत। ब्राह्मणम् उ हैव एतान् मंत्रान् प्रज्ञातान् विदधाति इति।' यज्ञविधींचे ज्ञान, पाच प्रकारांनी करून घ्यावे - छंदसा म्हणजे मंत्राने, ब्राह्मणाने, प्रत्ययेन म्हणजे ऋत्विजांच्या निर्देशनाने, न्यायेन म्हणजे समान संदर्भाने आणि संस्थावशेन म्हणजे यज्ञपूर्तीसाठी विहित विकल्पांद्वारे.

यातही मंत्र आणि ब्राह्मण यांचा अग्रक्रम स्पष्ट दिसतो. तंत्रवार्तिक (१.३.११ - आनंदाश्रम पान २३२) मात्र कल्पसूत्रांना अधिक प्राधान्य देत असल्याचे दिसते. वार्तिककार म्हणतात - 'वेदात् ऋतेऽपि कुर्वन्ति कल्पैः कर्माणि याज्ञिकाः । न तु कल्पैर्विना केचित मन्त्रब्राह्मणमात्रकात्।।' वेदांचा आधार न पाहताही कल्पसूत्रांच्याच साहाय्याने ऋत्विक् यज्ञ क्रिया पार पाडतात. परंतु कल्पसूत्रांच्या शिवाय केवळ मंत्रब्राह्मणांच्या आधारे, त्यांना यज्ञविधी पार पाडता येत नाही.

वस्तुतः यज्ञक्रिया आणि त्या क्रियेबरोबर विनियुक्त मंत्र यांचा जणू वाच्यवाचक भाव असावयास हवा. 'मन्त्र एव स्वयं कर्म प्रब्रूते' म्हणजे विनियुक्त मंत्रच अनुष्ठेय क्रिया सांगत असतो. यज्ञाची रूपसमृद्धी ती हीच. 'एतद् वै यज्ञस्य समृद्धं यत् रूपसमृद्धं यत् कर्म क्रियमाणम् ऋक् यजुर्वा अभिवदति' (गोपथ ब्रा २.२.६; २.४.२, निरुक्त १.१६). ब्राह्मण ग्रंथ त्या मंत्रातील क्रियारूप अर्थ सांगतात. मंत्रांना रूपसंपन्न करतात. (ब्राह्मणेन रूपसंपन्ना विधीयन्ते)

वैदिक मंत्र आणि यज्ञक्रियांचा असा संपृक्त संबंध परंपरेस अभिप्रेत असल्याने वेदार्थासाठी किंवा वैदिक संकल्पनांचे ज्ञानासाठी यज्ञविधीच्या ज्ञानाचा खूपच उपयोग होण्यासारखे आहे. उदाहरणार्थ - ऋग्वेदात अग्नीला पुरोहित, ऋत्विज्, होता, कविक्रतु, सत्य इत्यादी विशेषणांनी अलंकृत केलेले दिसते. यावरूनच वैदिक ऋषींना अग्नी म्हणजे केवळ महाभूतात्मक काष्ठाग्नी अभिप्रेत नव्हता हे स्पष्ट आहे. वेदांत अग्नीचे दैवतीकरण झालेले आहेच. पण त्याहीपलीकडे अग्नीला आध्यात्मिक 'Metaphysical' प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. अग्नीच्या आधिभौतिक स्वरूपाबरोबरच, त्याचे आधिदैविक आणि आध्यात्मिक स्वरूप लक्षात घेतले नाही तर अग्नीची वरील विशेषणे समजणारच नाहीत. वेदीमधील आहवनीयादी अग्नीची स्थाने लक्षात घेतल्याशिवाय 'पुरोहितम्' चा अर्थ कसा समजेल? 'पुरोहितम्' च्या 'पुढे ठेवलेला' एवढ्या अर्थाने जिज्ञासूंचे समाधान होणार नाही.

'अग्निर्होता ( कविक्रतुः)' या पंक्तीचा 'अग्नि, होता नावाचा ऋत्विज् आहे', एवढ्या अर्थामुळे सुद्धा अग्नीची भूमिका फारशी स्पष्ट होणार नाही. त्यासाठी पुनः यज्ञविधीची माहिती करून घ्यावी लागेल. यज्ञविधी- मध्ये 'होता' नावाचा मानुष

ऋत्विज् अग्नि देवाचे प्रतिनिध्य करतो हे समजून घ्यावे लागेल. होतृवरणाचे वेळी - अध्वर्यू म्हणतो - अग्निर्देवो दैव्यो होता देवान् यक्षत् विद्वांश्चिकित्वान् मनुष्वद् भरतवत् (कश्यपवत् अवत्सारवत् नैध्रुववत्) ब्रह्मण्वत् आ च वक्षत् ब्राह्मणा अस्य यज्ञस्य प्रवितार:, असौ गोपाल शर्मा मानुष:' (द्र. श ब्रा. १.५.१.५-१३) देवांचा होता, यष्टव्य देवतांचा ज्ञानी, विवेकी, ब्रह्मस्वरूपी अग्निदेव, मनूच्या यज्ञांप्रमाणे, देवतांकडे हव्य नेणारा, कश्यपाप्रमाणे, अवत्साराप्रमाणे, नैध्रुवा-प्रमाणे, देवतांचे आवाहन करो व त्यांच्यासाठी यज्ञ करो. ब्रह्म जाणणारे त्या यज्ञाचे संरक्षण करणारे आहेत. त्या अग्नीचा प्रतिनिधी हा गोपाल शर्मा मनुष्य 'होता' आहे.

वरण स्वीकारताना होत्याने पुढील मंत्र म्हणावा - 'एतत् त्वा सवित- र्वृणतेऽग्निं होत्राय सह पित्रा वैश्वानरेणाग्ने पूषन् बृहस्पते प्र च वद प्र च यज वसूनां रातौ स्याम रुद्राणामुर्व्यायां स्वादित्या अदितये स्यामानेहसो जुष्टामद्य देवेभ्यो वाचमुद्यासं जुष्टां ब्रह्मभ्यो जुष्टां नराशंसाय, यदद्य होतृवर्ये जिह्मं चक्षुः परापतत् अग्निष्टत् पुनरभ्रियाज्जातवेदो विचर्षणि:'। (कात्यायन हौत्र १.४.१) - हे सवितृदेवा तुझ्या अनुज्ञेने (यजमान), अग्नीला, पिता वैश्वानरासह होतृकार्यासाठी स्वीकारीत आहेत. हे अग्निदेवा, पूषन् आणि बृहस्पतिदेवा तू मोठ्याने बोल. याज्या मन्त्र म्हण. आम्ही वसू रुद्र आदित्य यांच्या कृपेत असावे. आज मी (मानुष होता) देवांना आवडेल अशी, ब्राह्मणांना रुचेल अशी, नराशंसांना मान्य होईल अशी वाणी उच्चारीन. होतृ वरणांत जो अंश कुटिल स्वरूपी होऊन नष्ट होईल तो अंश, हे अग्ने तू भरून काढावास.'

या होतृवरणाच्या यज्ञविधींवरून ऋग्वेदीय ऋषींच्या मनात सतत चालणाऱ्या वैश्विक यज्ञात, इतर दैवी शक्तींना आवाहन करणारा, दैवी, चेतन असा अग्नि असला पाहिजे हे स्पष्ट होईल. केवळ काष्ठाग्नि 'होता' कसा होऊ शकेल? दर्शपूर्ण-मासादि यज्ञ, वैश्विक यज्ञाचे प्रतीक असून, मानुष होता वैश्विक यज्ञातील अग्निरूपी होत्याची भूमिका करीत आहे. अग्नीचे हे होतृस्वरूप यज्ञविधींवरूनच जाणता येईल.

'सहस्रशीर्षा: पुरुष:' हे पुरुषसूक्त पुरुषमेध नावाच्या यज्ञविधीत विनियुक्त आहे, म्हणून हे सूक्त पुरुषमेधाच्या संदर्भात वाचले तर या सूक्ताच्या ऋषीच्या मनात डोकावता येईल. शतपथ ब्राह्मण (१३.६.१-६) या संदर्भात पृष्ठभूमी सांगते - ती अशी - 'पुरुषो ह नारायण: अकामयत अतितिष्ठेयं सर्वाणि भूतानि, अहमेव इदं सर्वं स्याम् इति। स एतं पुरुषमेधं पञ्चरात्रं यज्ञक्रतुमपश्यत्। तमाहरत् । तेनायजत । तेनेष्ट्वा अत्यतिष्ठत् सर्वाणि भूतानि' (पुरुष नारायणाने इच्छा केली, की मी सर्वभूतांच्या पलिकडे देखील शिल्लक रहावे. हे सर्व मीच व्हावे. त्यास पंचरात्र पुरुषमेधाचे दर्शन झाले. त्याने तो यज्ञ केला. पुरुषमेध यज्ञ करून तो पुरुषनारायण सर्व भूतादिकांच्या पलिकडे ही (दशांगुळे) उरला).

शतपथब्राह्मण (१३.६.२.८) पुरुषसूक्ताचा विनियोग सांगताना म्हणते - 'नियुक्तान् पुरुषान् ब्रह्मा दक्षिणत:, पुरुषेण नारायणेन अभिष्टौति' - यूपास बांधलेल्या पुरुषांची, ब्रह्मा ऋत्विज् त्यांच्या दक्षिणेकडे जाऊन 'पुरुष नारायण' सूक्ताने स्तुति करतो.

या यज्ञविधीच्या संदर्भाने - 'अत्यतिष्ठत् दशाङ्गुलम्', 'पुरुष एवेदं सर्वं यद् भूतं यच्च भव्यम्', 'एतावानस्य महिमा अतो ज्यायांश्च पूरुषः' इत्यादी पंक्तीचा अभिप्राय अधिक स्पष्ट होईल. भगवद्गीतेतील 'विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्' (भगी. १०.४२) या श्लोकाकडेही याच भूमिकेतून पाहिले पाहिजे.

यज्ञविधी, अशा वैदिक सूक्तांची आधिदैविक, आध्यात्मिक पृष्ठभूमी आणि संदर्भ देतात, आणि वेदविहित यज्ञानुष्ठान हे वैश्विक यज्ञधर्माच्या अंगाने तपासून पाहण्याविषयी संकेत देतात. या सूक्तातील - 'वसन्तो अस्यासीदाज्यं ग्रीष्म इध्मः शरद्धविः' इत्यादी मंत्रसुद्धा वैश्विक यज्ञाचाच अभिप्राय व्यक्त करतात. या वैश्विक यज्ञास अनुसरून देवांनी यज्ञ केले. तेच प्रथम धर्म म्हणून प्रसिद्धीस आले.

पुरूरवस् आणि ऊर्वशी यांच्या संवादसूक्ताची (ऋ १०.९५) पृष्ठभूमि, शतपथ ब्राह्मणाने (११.५.१) दिली असल्याने, या संवादसूक्ताचे संदर्भ स्पष्ट होण्यास मदत होते. अश्वत्थाच्या लाकडापासून अरणी कराव्यात असे विधान करण्यासाठी शतपथब्राह्मणाने या संवादसूक्ताचा उपयोग केलेला दिसतो.

तैत्तिरीय ब्राह्मणांत (१.२.१) - 'यदिदं दिवो यददः पृथिव्याः संजज्ञाने रोदसी संबभूवतुः। ऊषान् कृष्णमवतु कृष्णमूषा इहोभयोर्यज्ञियमागमिष्ठाः'।। असा मंत्र अग्न्याधेय प्रकरणांत संग्रहीत केलेला आहे. या मंत्राचा अर्थ, प्रकरण आणि यज्ञीय विधी पाहूनच करायला पाहिजे. या मंत्राचा शब्दशः अर्थ असा आहे - ' जे हे द्युलोकापासून, जे हे पृथिवीपासून, द्यावापृथिवी संगनमत करून एकत्रित राहिले. खाऱ्या मातीचे कृष्ण संरक्षण करो आणि खारी माती कृष्णाचे संरक्षण करो. दोहोंमधील पवित्र यज्ञीय अंशांनी येथे यावे.' अर्थातच एवढ्या अर्थाने अभ्यासकाचे समाधान होणार नाही.

येथील संदर्भ आणि यज्ञविधी पुढील प्रमाणे तैत्तिरीय ब्राह्मणाने (१.१.३) विशद केला आहे. 'द्यावापृथिवी सहास्तां । ते वियती अब्रूताम्। अस्त्वेव नौ सह यज्ञियम् इति। यदमुष्याः यज्ञियमासीत् तदस्याम् अदधात् त ऊषा अभवन्। यदस्या यज्ञियमासीत् तदमुष्यामदधात् तददश्चन्द्रमसि कृष्णम्। ऊषान् निवपन् अदो ध्यायेत्। द्यावापृथिव्योरेव यज्ञियेऽग्निमाधत्ते।' सृष्टी उत्पन्न झाली त्यावेळी द्यावापृथिवी एकत्रित होते. त्यांच्या मध्ये अंतरिक्षाचे व्यवधान नव्हते. त्यावेळी, प्राणिमात्रांना अवकाशासाठी ईश्वराज्ञेने द्यावापृथिवी परस्पर वियुक्त झाले. परंतु वियुक्त होतांना स्नेहातिशयामुळे ते परस्परांना म्हणाले - आपणांमध्ये जे यज्ञयोग सार आहे ते परस्परांजवळ असावे. म्हणजे पृथिवीवरील यज्ञयोग्य सारभूत द्युलोकापासून वियुक्त होऊ नये, तसेच द्युलोकातील यज्ञयोग्य सारभूत पृथिवीपासून दूर असू नये. म्हणून द्युलोकाने आपले यज्ञयोग्य सार पृथिवीस दिले. ते येथे खाऱ्या मातीच्या स्वरूपात प्रादुर्भूत झाले. पृथिवीने सुद्धा स्वतःजवळचे यज्ञयोग्य सार द्युलोकास दिले ते चंद्रावरील काळ्या कलंकाच्या चिन्हाने दिसू लागले.' अशी कथा सांगून तैत्तिरीय ब्राह्मण, अग्नीच्या स्थापनेपूर्वी अग्नीच्या आयतनांत खारी माती ओतावी, आणि त्यावेळी चंद्रावरील कलंकाचे अनुसंधान करावे, असे विधान करते. त्यामुळे द्युलोकांतून प्राप्त खाऱ्या मातीवर आणि

भूलोकासंबंधी सारभूत यज्ञिय द्रव्यावर अग्नीची स्थापना केल्यासारखे होते.

अन्य श्रुतींतही 'द्यावापृथिव्योर्यज्ञः प्रतिष्ठितः' अशी वचने आपणास मिळतात. या विधानांचाही संदर्भ वैश्विक यज्ञाशीच जोडावा लागतो. तत्संबंधी यज्ञक्रिया, त्या वैश्विक यज्ञाच्या प्रतीक ठरतात. हा संदर्भ आणि यज्ञक्रिया लक्षात घेतल्यासच वरील मंत्राचा आशय अधिक स्पष्ट होईल.

ऋग्वेदातील ज्ञानसूक्तांतर्गत 'सर्वे नन्दन्ति यशसाऽऽगतेन (१०.७१.१०) या प्रसिद्ध मंत्राचा विनियोग, सोमवल्ली विकत घेतल्यानंतर, ती शकटाने प्राचीन वंश मंडपाकडे वाहून नेत असताना करावा असे ऐतरेय ब्राह्मणाने (ऐब्रा १.१३) म्हटले आहे. पहा - 'सर्वे नन्दन्ति यशसाऽऽगतेनेत्याह। यशो वै सोमो राजा ....' इत्यादी - यशप्राप्तीमुळे सर्व आनंदित होतात. यश म्हणजे सोम असल्याने, सोमाच्या आगमनाने सर्व आनंदित होतात.

सोम आणि यश यांचे ऐक्य कल्पून सांगितलेला हा विनियोग कृत्रिम स्वरूपाचा वाटतो खरा. म्हणजेच ऐतरेय ब्राह्मणाने या मंत्राचा लावलेला यज्ञपर अर्थ ज्ञानसूक्ताच्या ऋषीस अभिप्रेत नसावा असे वाटते. तथापि ब्राह्मणकारांचा सोमाकडे यशाच्या स्वरूपाने पाहण्याचा दृष्टिकोन आपणास समजतो. शतपथ ब्राह्मणातील पुनराधान प्रकरणात (२.२.३.१) 'सोमो यशस्कामः (अग्निमादधे) स यशोऽभवत्' - 'यशाच्या प्राप्तीसाठी सोमाने पुनराधनाचे अनुष्ठान केले. त्यामुळे तो सोम यशःस्वरूपीच बनला'. सोम आणि यश यांचे पुनराधानयज्ञविधीच्या संदर्भात कल्पिलेले ऐक्य टाऊक झाले तर ऋषींची सोमराजाकडे पाहण्याची दृष्टी आपणांस समजू शकेल.

अर्थातच मंत्र आण यज्ञक्रिया यांचे संबंध संपृक्त आहेत की नाही हे तपासून घेतले पाहिजेत. मंत्र हे अनुष्ठानस्मारक असावेत असे मीमांसकांचेही मत आहे. परंतु मंत्राचे अनुष्ठानस्मारकत्व क्वचित व्यभिचरित सुद्धा होते, हे माधवाचार्यांनीही जैमिनीय न्यायमाला विस्तरात (१.२.११-१२) दृष्टोत्पत्तीस आणून दिले आहे. ते म्हणतात - 'दिवो वा विष्णवुत वा पृथिव्या महो वा विष्णवुत वान्तरिक्षात्। हस्तौ पृणस्व बहुभिर्वसव्यैरा प्रयच्छ दक्षिणादोत सव्यात्' (तैसं १.२.१३) इत्यस्मिन् मन्त्रे धनमाशास्ते इत्यर्थः प्रतीयते । अनुष्ठेयार्थस्तु शकट-स्थापनाय आधारभूतकाष्ठस्थापनम् । तत्तु ब्राह्मणेन विधीयते - 'दिवो वा विष्णवुत वा पृथिव्या इत्याशीःपदयर्चा हविर्धानस्य मेथीं निहन्ति' (तैसं ६.२.९) ।। याचा अर्थ असा की माधवाचार्यांच्या मते 'दिवो वा विष्णुवत' या मंत्राचा यज्ञिय विनियोग अत्यंत कृत्रिम स्वरूपाचा आहे. म्हणून मंत्र आणि यज्ञक्रिया यांचे संपृक्तत्व, मंत्रार्थ करतेवेळी तपासून पाहणे अगत्याचे आहे.

अशा रीतीने वर वर्णन केल्याप्रमाणे वेदांचे यज्ञ आणि अध्यात्म हे प्रमुख विषय दिसतात. हे दोनही विषय मूलतःच वैश्विक सृष्टीशी संबद्ध असल्याने एकमेकांपासून वेगळे करणे कठीण आहे. कर्मकांडातील यज्ञविधी वैश्विक यज्ञाचा संकेत करतात हे मात्र लक्षात ठेवले पाहिजे.

यामुळे वेदांच्या व्याख्या प्रक्रियेसाठी इतर अनेक

साहाय्यभूत प्रक्रियांबरोबर, योग आणि यज्ञशास्त्र यांचाही अभ्यास काही प्रमाणात नक्कीच पोषक ठरू शकेल.

'साक्षात्कृतधर्माण: ऋषयो बभूवु:' या परंपरेनुसार 'ऋषींची अनुभूती' हाच वेदांचा आधार आहे. अनुभूती आणि तर्क यांनी हातात हात घेऊन एकत्र वाटचाल केली पाहिजे. त्यांच्यात विरोध निर्माण झाल्यास अनुभूतीच्या विरोधी तर्क अप्रतिष्ठित ठरतो. सत्याच्या शोधार्थ साधना करणारे ऋषी आत्मानुभूती, अंत:प्रज्ञा आणि अंत:प्रतिभेवर भिस्त ठेवून होते. म्हणून वेदांच्या व्याख्येसाठी तत्संबंधी योग आणि यज्ञशास्त्राचा आधार शक्य तेथे घेणे इष्ट ठरेल.

अर्थात यज्ञ आणि योग एवढेच वेदांचे विषय नाहीत हेदेखील मान्य करायला हवे. वेदांत काही आर्येतरांच्याही परंपरांचे दर्शन होते. मुनि संप्रदाय, व्रात्य संप्रदाय आणि इतर भौतिक विषयही वेदांत दिसतात. त्यासंबंधात नीरक्षीर विवेक हवाच. वेदांकडे ऐतिहासिक दृष्टिकोणांतूनही पाहिले पाहिजे आणि तौलनिक भाषाशास्त्र, तौलनिक दैवतशास्त्र, तौलनिक धर्मशास्त्र इत्यादिकांचा आश्रय वेदव्याख्यानासाठी घेतला पाहिजे. त्याबाबतीत अनाग्रही असायला हवे.

वस्तुत: अर्थलापनाची कुठलीही पद्धती असली तरी सत्याचा शोध आणि ऋषींना अभिप्रेत असलेल्या अर्थाची उकल हेच ध्येय आणि साध्य असायला हवे. कारण सर्व अर्थलापनव्याख्या पद्धतींनी देवी वाणीची सफल उपासना करावयाची आहे.

तैत्तिरीय ब्राह्मणकार म्हणतात (२.८.८) - 'यामृषयो मन्त्रकृतो मनीषिण: अन्वैच्छन् देवा तपसा श्रमेण । तां देवीं वाचं हविषा यजामहे सा नो दधातु सुकृतस्य लोके ।।'

'देव आणि मंत्रद्रष्ट्या मनीषी ऋषींनी ज्या देवी वाणीला तपाने आणि श्रमाने प्राप्त करून घेतले, त्या देवी वाणीची आम्ही हविर्भाग देऊन उपासना करतो. त्या देवी वाणीने आम्हास पुण्यवंतांच्या लोकी स्थापित करावे.' या प्रार्थनेने माझ्या व्याख्यानाचा उपसंहार करतो.

धन्यवाद.

# शिल्पकलानिधी कृ.वि. वझे

डॉ. र. पु. कुलकर्णी

भारतीय मंदिर शिल्पाबद्दल संस्कृत भाषेत लिहिलेल्या शिल्पविषयक ग्रंथांत जी माहिती दिली आहे, तिचा परिचय फारच थोड्या लोकांना आहे. या भारत देशात कित्येक शतके कोणत्याही बांधबन्दिस्तीशिवाय ही भव्य, दिव्य देवालये उभी असूनही भारतीयांचे, ती बांधण्यासाठी जी शिल्पविद्या मध्ययुगीन काळाच्या आरंभी अत्यंत प्रगतावस्थेत होती तिच्या विषयीचे अज्ञान ही खरोखरच फार लाजिरवाणी गोष्ट आहे. या विषयावरील, म्हणजे भारतीय शिल्पशास्त्रविषयक संस्कृत ग्रंथांबद्दलची आपली जाण व अभ्यास नगण्य असाच आहे. या वस्तुस्थितीची जाणीव होऊन श्री. कृष्णराव विनायक वझे या जवळ जवळ पाऊणशे वर्षांपूर्वीच्या, इंजिनियरिंगचे शिक्षण घेतलेल्या विद्वानांनी मराठीत प्रथमच या शिल्पशास्त्राच्या ग्रंथांतील माहितीचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. या दृष्टीने ते या विषयाचे पितामहच ठरतील यात संशय नाही, व त्या दृष्टिकोनातून त्यांची ओळख करून देण्यासाठी या लेखाचा प्रपंच केला आहे.

श्री. कृष्णराव विनायक वझे यांचा जन्म १६ डिसेंबर १८६९ या दिवशी कोंकणांत एका विद्याविनयसंपन्न वैदिक घराण्यात झाला. श्री. कृष्णरायांचे आजोबा षट्शास्त्राध्यायी वैदिक विद्वान होते. परंतु त्यांच्या वडिलांनी वैदिकी सोडून वनखात्यात नोकरी धरली होती. श्री. कृष्णराव वझे हे बुद्धीने तल्लख असून ते त्यावेळची मॅट्रिकची परीक्षा वयाच्या सोळाव्या वर्षी उत्तीर्ण झाले. मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी पुणे येथील इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन Licenciate in Civil Engineering (L.C.E.) ही पदवी मिळवली. त्या काळी इंजिनियर्सना शासकीय सेवेव्यतिरिक्त इतरत्र कोठेही नोकरीची संधी नसल्याने ते देखील १८९१ साली त्यावेळच्या मुंबई प्रांताच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात (पी.डब्ल्यू.डी.) भरती झाले. त्यानंतर पंचवीस वर्षे शासकीय सेवेत घालविल्यावर सन १९१८ मध्ये त्यांनी सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यावेळी त्यांचे वय पन्नास वर्षांचे होत. त्यांची शासकीय नोकरीतील कामगिरी त्यांच्या कामातील हुशारीमुळे, प्रामाणिकपणामुळे व मन लावून काम करण्यामुळे उत्तमच झाली. केवळ ब्रिटिश सत्तेमुळे भारतीयांना आलेल्या धर्मग्लानीला निवारण्यासाठी व शिल्पशास्त्राच्या अभ्यासास चालना देण्यासाठी त्यांनी नियत वयोमानापूर्वीच सेवानिवृत्ती स्वीकारली. भारतीय धर्म व भारतीय शिल्पशास्त्र या दोन्ही विषयांत त्यांची कुशाग्र बुद्धी सर्वगामी असून या विषयांचा मूलभूत अभ्यास त्यांनी केला. त्यांचे या दोन्ही विषयासंबंधीचे विचार मूलगामी व त्यावरील त्यांचे भाष्य मूल्यवान असल्याचे आढळून आल्याने लोकमान्य टिळकांनी त्यांना या दोन विषयांवर ग्रंथनिर्मिती करण्यास प्रोत्साहित केले. निवृत्तीचा काळ हरी हरी म्हणत स्वस्थपणे न घालविता त्यांनी भारतीय धर्म व शिल्पशास्त्र याविषयी बरीच बहुमोल अशी ग्रंथरचना केली. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांची यादी शेवटी दिली आहे.

श्री. वझे हे व्यवसायाने इंजिनियर होते व त्यांचे या विषयाचे शिक्षण इंग्रजांनी ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे झाले. तेव्हांच त्यांना हा अभ्यासक्रम अपूर्ण व अभारतीय वाटला. त्यांनी वैदिक मॅगेझिनमध्ये लिहिले आहे की, 'मी मुंबई विद्यापीठाचा इंजिनियरिंगचा अभ्यासक्रम अभ्यासला. पण त्या संपूर्ण अभ्यासात मला एकाही भारतीय स्थपतीचा, भारतीयांनी स्थापत्यशास्त्रावर लिहिलेल्या ग्रंथाचा, फार काय तर त्यांनी तयार केलेल्या एखाद्या स्थापत्यविषयक सूत्राचा किंवा नियमाचा, कोठेही साधा विचार केलेला नसेल या गोष्टीवर माझा विश्वास बसला नाही. वेरूळ, अजिंठा येथील लेणी, ताजमहाल सारख्या भव्य वास्तुकृती, भरतपूर, ग्वाल्हेर येथील किल्ले, महाकाली, मुल्कमैदान अशा प्रचंड तोफा व अशोकाचा लोखंडी खांब अशा अनेक आश्चर्यजनक वस्तू निर्माण करणाऱ्या भारतीयांना स्थापत्यविषयक ज्ञान नव्हते असे कसे म्हणता येईल !' तेव्हां त्यांनी भारतीय शिल्पशास्त्र या विषयाचा अभ्यास करावयाचा निश्चय, ते विश्वविद्यालयात शिक्षण

येत होते तेंव्हापासून केला होता. त्यांच्या अभ्यासाचे फलित म्हणजे या विषयावर भारतीय भाषांत कमीत कमी तीनशे ग्रंथ आहेत असे त्यांच्या लक्षांत आले. त्यापैकी पन्नास ग्रंथ त्यांनी स्वत: पाहिले व वीस ग्रंथ स्वत:जवळ जमविले. त्यातील 'काश्यप शिल्पम्' हे संस्कृत भाषेतील शिल्पशास्त्रविषयक पुस्तक त्यांनी पुण्याच्या आनंदाश्रमामार्फत छापून प्रसिद्ध केले.

त्यांचे आवडते सूत्र म्हणजे कौटिलीय अर्थशास्त्रातील वाक्य 'नवेन अनवं शोधयेत्'. नव्या दृष्टीने जुन्याकडे पहावे किंवा जुन्यात नवे मिसळून बदललेल्या काळाशी जुळवून घ्यावे. ते स्वदेशबांधवांविषयी म्हणत की, 'ते अज्ञानी असल्याने एकतर जुन्यालाच चिकटतात अगर जुने फेकून देऊन नव्याशी तद्रूप होतात. साधारण मध्यम अवस्थेत त्यांना राहताच येत नाही.' त्यांनी असेही प्रतिपादन केले आहे की 'परकीयांचे नवीन चांगले घ्या, पण परकीयांचे वाईट, ते केवळ नवीन आहे या सबबीवर घेऊ नका. तसेच आपले चांगले, ते केवळ जुने आहे म्हणून टाकू नका. मिल, कार्लाईल, स्पेन्सर यांच्यावर जर विश्वास ठेवून त्यांची मते खरी मानता तर कपिलकणांवरच अविश्वास करू नका. त्यांच्याही वचनांचा अभ्यास करा व अनुभव घ्या.'

स्वातंत्र्यपूर्व भारताच्या अधोगतीचे त्यांनी केलेले वर्णन आज स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झालीत तरी ते यथायोग्य आहे असे म्हणता येईल, व यातच त्यांचे द्रष्टेपण दिसून येते. 'हिंदुस्थानातील सामाजिक पद्धती धर्माच्या पायावर उभारलेली आहे. धर्म व व्यवहार हे अगदी एकजीव झालेले आहेत. पण कारणे सांगण्याची हिंदु धर्मशास्त्रकारांची पद्धत नसल्यामुळे व कारणावाचून हिंदी पद्धत मान्य केली पाहिजे. अशी सक्ती नाहिशी झाल्यामुळे हल्ली सर्वत्र बखेडा झाला आहे. हिंदुस्थानातील लोकसंख्येची वाढ व हवापाणी देखील बखेड्याला अनुकूल अशी आहेत. हल्लीची शिक्षणपद्धती विध्वंसक आहे, विधायक नाही. पाश्चात्यांच्या गोष्टी कारण वगैरेंची चौकशी न करता स्वीकाराव्या पण हिंदी गोष्टी तशा स्वीकारू नयेत असे प्रत्यक्ष अगर पर्यायाने सांगणारे शिक्षण हिंदुस्थानात प्रचलित आहे. हिंदी लोकांची एकी किंवा संघटना म्हटली की सरकारचे धाबे दणाणते व एकमेकांनी एकमेकांना मदत करावी व सगळ्यांनी मिळून सहकार्याने कामे करावीत असे शिक्षण देण्यात येत नाही. यामुळे काम व ज्ञान यांची खरी गोडी शिक्षणामुळे लागत नाही. शिकलेल्या माणसाला कामाचा कंटाळा व ज्ञानाची अरुची असा प्रकार आहे. लोकांना आपले मन मोकळे करून सांगण्याची मोकळीक नाही व यामुळे मनात धुमसत असलेले विचार केव्हा केव्हा भडकून जातात. वाईटाबद्दल तिटकारा वाटणे स्वाभाविक असून सुद्धा वाईट राज्यकारभाराचा द्वेष म्हणजे राजद्रोह समजला जातो. माणसाप्रमाणेच वर्तमानपत्रांना मन मोकळे करून बोलण्याची परवानगी नाही. ज्यामुळे शिक्षण घेणाऱ्या तरुणांना राज्याची खरी स्थिती अनुभवास येते पण बोलता वगैरे येत नाही हे पाहून ढोंग करण्याची सवय लागते. असत्य भाषण म्हणजे पाप ही भावना जाऊन असत्य भाषण व ढोंगीपणा म्हणजे शहाणपण किंवा व्यवहारचातुर्य समजण्यात येते. तरुणांचे लक्ष प्रत्यक्ष व्यवहाराकडे न लागता काल्पनिक मनोराज्यांत गढून गेलेले असते व यामुळे त्यांची कर्तबगारी खुंटून मानसिक ऱ्हास होतो. याप्रमाणे सुंदर गुरुशिष्यसंबंध, उत्तम जातिव्यवस्था, सर्वोत्कृष्ट समाजपद्धती हिंदी समाजात असून त्यांचा पुरस्कार करणाऱ्या संस्था हिंदुस्थानात नाहीत अशी स्थिती निर्माण झाली आहे

त्यांच्या शिल्पशास्त्राच्या ग्रंथांतील दोन उतारे त्यांच्या प्रतिपादनाचे प्रतिनिधिक म्हणून खाली दिले आहेत.

'अगदी पहिला शिल्पग्रंथकार म्हणजे कश्यप होय. तैत्तिरीय आरण्यक प्रपाठक १, कांड ७ मध्ये त्याचा उल्लेख आहे तो असा :

'यत्ते शिल्पं कश्यप रोचनावत्'

हे कश्यप तुझे शिल्प फार मनोहर आहे. तसाच शतपथ ब्राह्मणांत पण असा उल्लेख आहे.

'शिल्पात् कश्यपात् शिल्पः कश्यपः
कश्यपात्रै ध्रुवैः कश्यपात्रै ध्रुवै:।

या नंतर शिल्पावर ग्रंथ लिहिणारे एकंदर अठरा आचार्य झाले. त्यांनी केलेल्या ग्रंथांना 'संहिता' (सम् एकत्र किंवा नीट व धा ठेवणे या पासून) नीट मांडलेले किंवा एकत्र केलेले ग्रंथ म्हणतात.

या सर्व अठरा संहिता हल्ली उपलब्ध असलेल्या दिसत नाहीत. पण तीन संहिता पाहण्यात आहेत. त्या कश्यपसंहिता, भृगुसंहिता व मयसंहिता. हिंदी शिल्पाचे निरीक्षण केले म्हणजे असे दिसते की, नर्मदा उत्तर भागी कश्यप संहिते प्रमाणे कामे करण्याचा प्रघात आहे. नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत भृगुसंहितेप्रमाणे कामे करतात व तुंगभद्रेचे खाली दक्षिणेस मयसंहितेप्रमाणे रचना होते. शास्त्रे वगैरे ग्रंथांत पण ज्यात वास्तु शब्द प्रमुख आहे असे ग्रंथ मयसंहितेचे अनुयायी आहेत. शिल्प हा शब्द ज्यांत प्रामुख्याने येतो ते कश्यप संहितेला अनुसरतात व इतर भृगुसंहितेच्या नेतृत्वाखाली कामे करतात. भृगुसंहिता आधार मानणारे दोन ग्रंथ ज्यांचा पुष्कळ फैलाव आहे असे म्हणजे शिल्पदीपिका व राजवल्लभ होत. नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंतची म्हणजे महाराष्ट्रातील बहुतेक कामे या दोन ग्रंथांप्रमाणे केलेली दिसतात. तथापि पेशवाईत नाशकास बांधलेली तीन प्रमुख देवळे तीन संहितांप्रमाणे बांधलेली आहेत. नारोशंकर यांनी बांधविलेले महादेवाचे देऊळ कश्यपसंहितेप्रमाणे असून चंद्रचूड यांनी बांधविलेले सुंदर-नारायणाचे देऊळ भृगुसंहितेप्रमाणे आहे व ओढेकर यांनी बांधविलेले काळ्या रामाचे देऊळ मयसंहितेप्रमाणे बांधलेले आहे. यावरून पेशवाईत तिन्ही संहिता जाणणारे कारागीर व ब्राह्मण होते असे दिसते. यापुढे मात्र या संहिता मागे पडलेल्या दिसतात.

शिल्पसंहितेत एकंदर दहा शास्त्रांचा अंतर्भाव होतो. ती दहा शास्त्रे म्हणजे १) कृषिशास्त्र २) जलशास्त्र ३) खनिजशास्त्र ४) नौकाशास्त्र ५) रथशास्त्र ६) विमानशास्त्र ७) वास्तुशास्त्र ८) प्राकार शास्त्र ९) नगररचना शास्त्र व १०) यंत्रशास्त्र ही होत. हल्ली या शास्त्रांची, विशेषतः यंत्रशास्त्राची फार वाढ झाली आहे. तथापि या सर्वांचे मूल स्वरूप वेदांत व त्या काळापुरती वाढ आपल्या संहिता व शास्त्रग्रंथांतून झालेली आपणांस पाहणेस मिळते. हिंदुस्थानची संस्कृती पुष्कळ जुनी व पूर्णत्वास पोचलेली होती व त्या सुधारलेल्या समाजाचे काम सुयंत्रपणे चालविण्यापुरते शास्त्रीय वगैरे ज्ञान आपल्या पूर्वजांनी मिळवून ग्रंथांत नमूद करून ठेवले आहे, व त्यांचे अनुभव आपल्या परिस्थितीस योग्य असे आहेत.'

'शिल्पशास्त्रातील युगचतुष्ट्य-

कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः।
उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतः संपद्यते चरन् ॥

कलियुगात हिंदुस्थानच्या भूगर्भात सामसूम असून द्वापर युगात त्यात थरावर थर रचण्याचे काम चालू होते. त्रेतायुगात स्फोटावर स्फोट होऊन मोठमोठे उंचवटे व डोंगर तयार झाले असून कृतयुगात सारख्या चळवळी चालू होत्या.

भूगर्भात पुष्कळ उलाढाली ज्या काळात झाल्या त्या काळाला हिंदी शास्त्रकार कृतयुग म्हणतात. मद्रास इलाख्यातील भूभाग हा असा असून तो आजतागाईत केव्हाही पाण्याखाली गेल्याचे चिह्न त्यावर दिसत नाही. समुद्रतळाचे शेजारी बसणारे गाळाचे थर या भागांत मुळीच बसलेले आढळत नाहीत. ज्या काळात हिंदुस्थानात पुष्कळ ज्वालामुखी होते व त्यातून पातळ रस बाहेर पडून त्या रसाचे खडक होत, त्या काळाला त्रेतायुग म्हणतात. बृहन्महाराष्ट्र व विंध्यपर्वत हे प्रदेश अशा प्रकारचे आहेत. ज्या काळात थरावर थर बसून गाळाचे दगड बनले त्याला द्वापर युग म्हणतात. सिंधु, गंगा व ब्रह्मपुत्रा यांची खोरी व हिमालय हा प्रदेश असा आहे. या घडामोडी होऊन सर्व शांत झालेला जो काळ तो कलियुग होय.

फार प्राचीन काळी पृथ्वीच्या प्रारंभी बनलेल्या खडकात कोणाही जीवांचे अवशेष सापडत नाहीत म्हणून त्यांना इंग्रजीत 'अनफासिलिफरस' व संस्कृतात 'तामस' खडक म्हणतात. या खडकांत पुष्कळ घडामोडी झाल्या म्हणजे त्यांना इंग्रजीत 'मेटामार्फिक' व संस्कृतात 'वेसर' म्हणतात व ज्या युगांत हे खडक होतात त्या युगाला इंग्रजीत प्रायमरी किंवा आर्कियन युग म्हणतात व संस्कृतात त्याला कृतयुग म्हणतात. इंग्रज भूगर्भशास्त्रज्ञांनी हिंदुस्थानांतील तामस खडकांचे दोन भाग केले आहेत; एकाला ते 'आर्कियन' व दुसऱ्याला 'पुराण' असे ते म्हणतात. हिंदी शास्त्रकारांनी या कृतयुगाचे तीन भाग केले असून त्यांस त्यांनी रत्नचक्र, हेमचक्र व लोहचक्र अशी नावे दिली आहेत. रत्नचक्र व हेमचक्र हे काळ इंग्रजी आर्कियन मध्ये येतात व लोहचक्र हा इंग्रजी पुराण काळाशी मिळत आहे. रत्नभागांत संगमरवरी दगड, अभ्रक वगैरे प्रकार येत असून हेम भागात

सोनेचांदीच्या खाणींचे प्रदेश येतात. लोहभागांत तांबे वगैरे धातू सापडणारे प्रदेश येतात.

ज्वालामुखीस्फोटांनी तयार झालेल्या खडकात पण जीवांचे अवशेष सापडणे अशक्य असते. पण त्या काळी जीव नसतील असे म्हणता येत नाही व यासाठी या काळाला त्रेतायुग व दगडांना राजस दगड किंवा द्राविड दगड असे हिंदी शास्त्रकार म्हणतात. इंग्रज भूर्गभशास्त्रांनी पण त्या खडकांना 'द्रवीडियन' असे नाव दिले आहे. या त्रेतायुगात पण एक मागून एक असे तीन ज्वालामुखीचे स्फोट झाले ही गोष्ट पाश्चात्य व हिंदी दोन्ही शास्त्रकारांना संमत आहे. या भागांना निरनिराळी नावे देण्यासारखी स्थिती नाही तरी हिंदी शास्त्रकारांनी यांना पाषाणचक्र, ग्रावचक्र व मृच्चक्र अशी नावे दिली आहेत. कोरीव लेणी करण्यासारखे प्रदेश पाषाणचक्रांत, मोठमोठे टोले असलेले प्रदेश ग्रावचक्रांत, व मुरूम व काळ्या मातीचे प्रदेश मृच्चक्रात येतात.

हिंदी शास्त्रकारांच्या मते द्वापर युगाचा जो काळ त्याला इंग्रज भूगर्भशास्त्रज्ञांनी 'आर्यन युग' असे नाव दिले आहे. या युगाचे इंग्रज शास्त्रज्ञांनी गोंडवन, डेक्कन (दंडकारण्य) व अलिकडचा असे तीन भाग पाडले आहेत. गोंडवन भागात वऱ्हाड व मध्यप्रांत येतात, डेक्कन भागात सह्य व विंध्य यांचे उंचवटे किंवा शेवटचे थर येतात व अलिकडच्या भागात नद्यांची खोरी, रण वगैरे प्रदेश येतात. या सात्विक भागाचे हिंदी शास्त्रकारांनी जलचरचक्र, वृक्षचक्र व वनचरचक्र असे भेद केले आहेत. शंख, मत्स्य व कूर्म हे जलचरचक्रांत, वराह, मृग वगैरे वृक्षचक्रांत व हस्त्यश्वमनुष्य हे वनचरचक्रात येतात.

त्यानंतर कलियुग किंवा चढाओढीचा काळ आला. या काळापासून हिंदुस्थानच्या भूरचनेत फेरफार झाले नाहीत. हिंदुस्थानांत सर्वत्र स्थिरस्थावर होऊन देशात मनुष्यांची वस्ती होऊन शिल्पप्रचार झाला.

मद्रासेकडील तामस खडकांवर रसाचे लोट जाऊन द्राविड खडक तयार झाले आहेत. यावरून कृतयुगानंतर त्रेतायुग झाले. विंध्याच्या रसाच्या दगडावर वऱ्हाडचे गाळाचे दगडांचे थर आहेत. यावरून त्रेतायुगानंतर द्वापार युग झाले हे उघड होते. वेदातील एक, दोन, तीन, चार यांना कृत, त्रेता, द्वापर व कली ही नावे असून महायुगांना पहिले (प्रायमरी), दुसरे (सेकंडरी), तिसरे(टर्शरी) व चौथे (रिसेंट) अशी नावे न देता कृत, त्रेता,द्वापर व कली अशी नावे दिली आहेत. युधिष्ठिर शकापासून सुरू झालेल्या कलियुगाचा या भूरचनेतील कलियुगाशी कोणताही संबंध नाही. एकच सामान्य परिभाषा सर्वत्र वापरण्याचा हा प्रघात हिंदी ग्रंथ लावताना जागोजाग लक्षात ठेवला पाहिजे.'

सक्कर धरण बांधण्यांत त्यांचा सिंहाचा वाटा असल्याने ब्रिटीश सरकारने त्या कामाबद्दल त्यांना 'रावबहादूर' हा किताब दिला होता. परंतु तो त्यांनी परत केला. त्यांनी आपली इहलोकीची यात्रा ३१ मार्च १९२९ या दिवशी संपविली. त्यांच्या काळात शिल्पशास्त्रविषयक अनेक ग्रंथांची हस्तलिखिते मिळवून, त्यांचा अभ्यास करून हा संपूर्णपणे नवीन विषय महाराष्ट्रीय लोकांसाठी खुला करून दिला ही त्यांची कृती लोकोत्तर खरीच.

*श्री. कृष्णराव विनायक वझे यांची ग्रंथसंपदा*

१. धर्म शिक्षणाचा ओनामा : हिंदुधर्म, पुस्तक पहिले, ( प्रवृत्त्यंतर्गत विध्युक्त नित्यकर्म), १९२०; पुणे.

२. धर्म शिक्षणाचा ओनामा : हिंदुधर्म, पुस्तक दुसरे, ( प्रवृत्ति-विधि-नैमित्तिक-सण), १९२१; पुणे.

३. धर्म शिक्षणाचा ओनामा : हिंदुधर्म, पुस्तक तिसरे, ( प्रवृत्ति-विधि-नैमित्तिक-संस्कार), १९२१; पुणे.

४. धर्म शिक्षणाचा ओनामा : हिंदुधर्म, पुस्तक चौथे, ( प्रवृत्ति-निषेध), १९२१; पुणे.

५. हिंदुधर्म शिक्षणाचा ओनामा : हिंदुधर्म, निवृत्ति-धर्म-सच्छास्त्र, पुस्तक पाचवे, १९२५; नाशिक.

६. हिंदुधर्म शिक्षणाचा ओनामा : पुस्तक आठवे, स्त्रीधर्म शिक्षण, १९२५; नाशिक.

७. भावी हिंदी स्वराज्य : प्राचीन हिंदी राजकीय संस्था व ग्रामपंचायती त्यांच्या माहितीपासून आजतागायत - सूचीसह, शके १८४६, पुणे.

(पान क्र. ४०वर)

# एक्टोप्लाझम व मूर्त देह निर्मिती

श्री. व वि. अकोलकर

काही व्यक्तींनी प्लँचेटवर बोट टेकवले की उपस्थित व्यक्तींनी 'मृतात्म्यांना' उद्देशून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे म्हणून प्लँचेट मधील पेन्सिलीने कागदावर अक्षरे लिहिली जातात. काही व्यक्ती अक्षरफलकावर (ouija board) उपडा पेला ठेवून किंवा चकती ठेवून तिच्यावर बोट टेकवतात - व ज्या अक्षरांना स्पर्श होईल त्यातून तथाकथित संदेश प्राप्त होतो. काही व्यक्तींची एरवीची मन:स्थिती पालटते, त्या तंद्रावस्थेत जातात व त्यांच्या तोंडी जणू दिवंगतांनी दिलेली प्रश्नांची उत्तरे अथवा दिलेली माहिती येते. काही व्यक्तींच्या तंद्रावस्थेत कोणी दिवंगत लिहवीत असल्याप्रमाणे त्यांचा हात लिहू लागतो. काही व्यक्तींना कोणी तरी आपल्या मनाशी संपर्क साधू पाहत आहे व लिहून घेण्यास भाग पाडत आहे असे वाटते व त्यांना जे 'ऐकू येते' ते कागदावर टिपून घेतल्यावाचून राहवत नाही. कधी-कधी तंद्रावस्थेत गेलेल्या व्यक्तीच्या तोंडून कोणीतरी अज्ञात व्यक्तित्व बोलत असल्याप्रमाणे वाक्ये येतात व ते अज्ञात व्यक्तित्व स्वतःविषयी माहिती देते. अशा सर्व व्यक्ती मानसिक माध्यम (Mental Mediums) म्हणून ओळखल्या जातात. स्वीडन बोर्ग, रेव्हरंट स्टॅटन मोझेस, श्रीमती लिओनारा पायपर, श्रीमती ऑसबोर्न, श्रीयुत आर्थर फोर्ड, श्रीमती व्हेराल, श्रीमती कुंब टेनंट, श्रीमती अर्ल, श्रीयुत हॅफस्टीन, इत्यादी व्यक्ती या संदर्भात प्रसिद्धी पावलेल्या आहेत. मानसिक माध्यमांच्या तोंडून अथवा हातून त्यांच्याच मनात असलेल्या परंतु त्यांची त्यानाच जाणीव नसलेल्या गोष्टी-(स्मृती, विचार कल्पना, इ.) आलेल्या असतात काय ? किंवा, तंद्रेसारख्या पालटलेल्या अवस्थेमध्ये, दैनंदिन व्यवहाराशी निगडित असलेल्या त्याच्या मानस-प्रवाहापासून वियोजित असलेला उपप्रवाह ( dissociated) त्या व्यक्तींचा ताबा घेत असतो काय ? किंवा, खरोखरच कोणी दिवंगत व्यक्ती त्यांच्या द्वारा संप्रेषण करीत असते काय ? हे प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत व 'माध्यमा' द्वारे आलेली संप्रेषणे अथवा 'संदेश' दिवंगतांकडून आले असे केव्हा म्हणता येईल याविषयी विपुल चर्चा झालेली आहे.

**भौतिक माध्यम :**

गेल्या शतकापासून काही स्त्रीपुरुष 'भौतिक माध्यम' (Physical Medium) म्हणून ख्याती पावलेले आहेत व त्यांच्याकडे वैज्ञानिकांचेही लक्ष वेधले गेले आहे. या स्त्रीपुरुषांच्या बैठकीत (Seance) प्रकाशाचे गोल चमकणे, वस्तू विनास्पर्श हलू लागणे, तंतु वाद्ये विनास्पर्श झंकारू लागणे, दुसरीकडे असलेल्या वस्तू बैठकीच्या खोलीत येऊन पडणे, सुगंधी अत्तरांचे थेंब छतावर-भिंतीवरून ठिपकू लागणे, वस्तू आपोआप जमिनीपासून अधांतरी जाणे इ. भौतिक स्वरूपाचे प्रकार निरीक्षकांच्या समक्ष घडत. Physical research, वाङ्मयात Daniel Douglas Home, रेवरंट स्टॅटन मोझेस, श्रीमती फिरमन, श्रीमती स्लेड, कॅझेटी, चार्लस बेले, श्री. एग्लिंटन, श्रीमती युसेपिया प्लदिनॉ इ. व्यक्ती प्रसिद्धी पावल्या आहेत.

काही भौतिक माध्यमांच्या बाबतीत वर उल्लेख केलेल्या प्रकारापेक्षा अधिक विलक्षण असा प्रकार घडत असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. उदा. माध्यमाच्या खांद्यापासून आणखी एक हात निर्माण होणे व काही क्षणांनी तो विरून जाणे. नेपल्स येथील युसेपिया प्लादिनॉच्या बाबतीत हा प्रकार अनेक शास्त्रज्ञांनी पाहिला. फ्रेंच शरीरवैज्ञानिक व नोबेल पारितोषिकाचे मानकरी प्रो. Charles Richet हे त्यांपैकी एक होत. या प्रकाराची शहानिशा करण्यासाठी, Society for Physical Research ने हेरवर्ड कॅरिंग्टन (जादुगार) व अन्य दोन सदस्यांची समिती नेप्लसला पाठविली व त्या समितीने परिस्थितीवर नियंत्रण ठेवून तिच्या अनेक बैठका घेतल्या. समितीने दिलेल्या अहवालात, कॅरिंग्टन यांनी तो प्रकार प्रत्यक्ष अनुभवल्याचे नमूद केले. फ्रेंच शरीरवैज्ञानिक व

नोबेल पारितोषिकाचे मानकरी प्रो. Charles Richet यांनीही हा प्रकार पाहिला होता.

काही भौतिक माध्यमांच्या बाबतीत याहून वेगळा ही विस्मयजनक प्रकार दृष्टीस पडे. तो म्हणजे त्यांच्या शरीराहून वेगळे असे एक चालते बोलते शरीर कृतिक्षम शरीर दृग्गोच्चर होई व काही क्षणानंतर विरून जाऊन अदृश्य होई. (Spirits च्या अस्तित्वावर विश्वास असलेल्यांना ते मूर्त शरीर म्हणजे Spirit ने देहरूपाने दिलेले दर्शन वाटत असे. वैज्ञानिकांनी मात्र असा प्रकार खरोखरीच घडून येतो काय हा प्रश्न हाती घेतला. त्यांना काही माध्यमांचे सहकार्य ही लाभले व या वैज्ञानिकांनी नामांकित शास्त्रज्ञांच्या समक्ष व नियंत्रण ठेवलेल्या परिस्थितीत या माध्यमांच्या बैठका घेतल्या. निरीक्षकांच्या नोंदी ठेवण्यात येत, मॅग्नेशियमच्या प्रकाशात अथवा Flash Light मध्ये त्या दुसऱ्या शरीराचे फोटो घेण्यात येत.) या विस्मयजनक प्रकारांच्या संदर्भात, Florence Cook, Katic Cook, Charles Edward, Williams, Frank Kuski, Eva-C ही नावे प्रसिद्ध आहेत. Florence च्या बैठकीत तसेच Kuski च्या वॉर्सा येथे योजलेल्या बैठकीत एक निराळा देह निर्माण झाल्याचा प्रकार Prof. Charles Richet यांनी पाहिला होता. मूर्त-शरीर निर्माण झाल्याची २२५ उदाहरणे, जर्मन शास्त्रज्ञ Prof. Baron Von Schrenck-Notzing यांनी त्यांच्या ग्रंथात दिली आहेत. [१]*

१८७३-७४ मध्ये Edward Williams च्या बैठकीत John King हे नाव सांगणारा एक वेगळा देह निर्माण झाल्याचे Sir William Crookes यांनी पाहिले होते. १८७३ च्या अखेरीस त्यांनी Florence Cook च्या बैठका घेण्यास सुरुवात केली. सतरा वर्षे वयाची Florence पडद्याआड मूर्च्छित अवस्थेत असतेवेळी त्या पडद्याच्या कडेस किंवा पडद्याबाहेर एक स्त्री देह प्रकट होई, 'Katic King' ह्या नावाने उपस्थित व्यक्तींशी बोले व वागे व काही वेळाने निरोप घेऊन पडद्याआड अदृश्य होई. Florence च्या बैठका अनेकांनी पाहिलेल्या होत्या. १९७२ मध्ये Crookes देखील तिच्या बैठकांस जात असत व तिच्या परीक्षा घेत. जेव्हा Florence वर लोकांना फसवण्याचे जाहीर आरोप होऊ लागले, तेव्हा, तिने आपणहून केलेल्या विनंती मुळे Sir Crookes, १९७३ अखेरीपासून स्वत:च्या प्रयोग शाळेत तिच्या बैठका, नामवंत व्यक्तींच्याउपस्थितीत घेऊ लागले. 'Katic King' च्या शेजारी स्वत: उभे राहून त्यांनी फोटो काढून घेतले. 'katic King' च्या a Florence च्या पावलांच्या आकारांची तुलना केली, दोघींच्या उंचीतील तफावत पाहिली, Florence चे केस व 'Katic' चे केस यांची तुलना केली. ( Sir Crooks यांनी 'Katic' च्या केसांची कापून घेतलेली बट, ब्रिटन मेमोरियल लायब्ररी मध्ये जपून ठेवलेली आहे.) Sir Crooks यांनी जाहीर केले की, Florence व 'Katic King' ही शरीरे, भिन्न आहेत. [२] डच सायकिकल रीसर्च, A.K. Riko हे त्यांच्या इंग्लंडमधील मुक्कामात फ्लॉरन्स कुकच्या एका बैठकीस हजर होते. त्यांच्या ग्रंथात (१९०६) त्यांनी लिहिले आहे : "फसवणुकीस वाव नाही अशी प्रत्येक दक्षता घेण्यात आली होती. 'केटी किंगने' दिव्याच्या प्रकाशात दर्शन दिले. त्यावेळी पडद्याआड फ्लॉरिन्स सुस्कारे सोडीत होती. शेवटी तिला भेटण्यासाठी अनेकदा (मला) आत बोलावण्यात आले. मी फ्लॉरिन्सच्या खुर्चीजवळ उभा राहिलो आणि अगदी माझ्यासमोर तो मूर्तदेह उभा होता. त्याने माझा हात धरला व विनंती केली की : 'फ्लॉरिन्सच्या कानात डूल आहेत पण माझ्या कानात नाहीत याची खात्री करून घ्या'. मी पूर्ण खात्री करून घेतली. (J.S.P.R., Vol. 43 1966. George Zorali यांची नोंद.) १८७४ ते १८७९ दरम्यान, Florence च्या बैठकांमध्ये, 'Leilla' व 'Marie' हे मूर्त - देह प्रकट होऊ लागले. 'Marie' हे शरीर प्रकट होऊ लागल्यापासून, 'Florence' च्या बैठका, Berlin मध्ये अनेकांनी घेतल्या.

परंतु 'Katic King' हे शरीर Florence च्या शरीराहून निराळे आहे असे Sir Crookes नी म्हटले, पण ते कोणत्या द्रव्याने बनलेले आहे हा प्रश्न त्यांनी हाती घेतला नाही, कारण त्यांच्या स्वत:च्या रसायनशास्त्रीय संशोधन कार्यात त्यांना खंड पडू द्यावयाचा नव्हता.

मूर्त-देह प्रकटन हा प्रकार विवाद्य बनला. संशयवादी व तर्कबुद्धिवादी त्या विरुद्ध बोलू व लिहू लागले. अशा परिस्थितीत, मूर्त-देह निर्मितीची सुरुवात कशी होते, कोणकोणते टप्पे घेतले जातात हे दर्शविणारी छायाचित्रे अर्थातच ठोस पुरावा म्हणून उपयुक्त ठरणार होती. तशी

संधी अभ्यासकांना Eva-C. या माध्यम स्त्रीच्या बाबतीत लाभली.

Eva.C : Paris येथे Juliette Alexandre Bisson यांनी Eva.C या तरुण मुलीला शास्त्रशुद्ध रीत्या प्रशिक्षण देऊन तिचे माध्यमत्व विकसित केले व नंतर अनेक निरीक्षकांसमक्ष तिच्या बैठका योजिल्या. तिला गाढ संमोहित अवस्थेत नेल्यानंतर कॅबिनेटच्या काळ्या पडद्याआड बसवले जाई. खोलीतील मंद प्रकाशामुळे ती निरिक्षकांना दिसत असे. तिचे दोन्ही हात पडद्याबाहेर असत व निरीक्षक ते धरून ठेवीत. त्यावेळी तिच्या अंगावरील झग्याच्या छिद्रांतून एक धूसर द्रव्य बाहेर पडत असे, त्यास हात, बोटे, चेहरा इत्यादी आकार प्राप्त होत, संपूर्ण देह तयार होई, व काही वेळाने विरून जाई. हे प्रकार घडत असतानाची २०० छायाचित्रे मादाम बिसाँ यांनी त्यांच्या ग्रंथांत प्रसिद्ध केली. त्या वेळी तिच्या शरीराच्या निरनिराळ्या भागातून विशेषतः तोंड, मस्तक, टाळू, वक्षस्थल, बोटांची टोके यांमधून Eva च्या काळ्या झग्यावर वालाच्या बिया किंवा लहान नाण्याच्या आकाराचे ठिपके चकाकू लागत. थोड्या वेळाने तो पदार्थ नखे असलेले बोट, हात, मस्तक व केस यांचे आकार घेई. ते हात वस्तू पकडू शकत व खोलीतील वस्तूंना स्पर्श करू शकत. कधी-कधी तो पदार्थ लवचिक धागे तर कधी फितीप्रमाणे चपटा आकार घेई. त्याचे धागे बनले की ते निरीक्षकांना कोरडे व टणक लागत. Eva चा Ectoplasm, तिच्या गुह्यापर्यंत उतरे, व विलग होऊन तिच्या पासून दूर जात असे. त्यातून आकारास आलेल्या अवयवांना निरिक्षकांनी स्पर्श केला की त्याचे संवेदन खुद्द Eva ला होई. त्यावर एकदम तीव्र प्रकाश टाकला की Eva ला वेदना होऊन ती विव्हळे, व तो Ectoplasm तिच्या शरीरात शोषला जाई. यावरून Ectoplasm चे बनलेले शरीर म्हणजे Eva चे दुसरे शरीर होय असे शरीरशास्त्रीय दृष्ट्या म्हणता येण्यासारखे आहे. चिकटसर द्रव पदार्थ बाहेर पडे. व त्यास अवयवांचे रूप प्राप्त होई. मादाम बिसाँ नी लिहिले आहे : " ते द्रव्य, मी अगदी जवळून बघितले आहे. बहुतेक वेळा त्या मध्ये, वेडेवाकडे Streaks व धागे दिसतात. Eva च्या विवस्त्र शरीरातून, ते द्रव्य बाहेर पडत असताना, पुन्हा शरीरात प्रवेश करीत असताना, पुनश्च बाहेत येऊन, अवयवांचे रूप घेताना, आणि इकडून तिकडे जाताना मी पाहिलेले आहे. ते अवयव माझ्या हातांना, ओलसर व वजनदार लागले", मादाम बिसाँ यांनी Flash light मध्ये Eva ची छायाचित्रे घेतली. प्रथम - प्रथम त्या वेळी Eva मूर्च्छित पडे. पण नंतर Flash light ला सरावली. तरी पण ती अस्वस्थ मात्र होत असे. तिच्या शरीरातून बाहेर आलेल्या त्या Ectoplasm नामक द्रव्यास पकडण्याचा निरीक्षकाने प्रयत्न केला की तिला झटका बसल्याप्रमाणे होत असे.

त्या द्रव्यातून निर्माण झालेल्या आकृतींची तिला भीती वाटे व " मला वाचवा" असे ती विनवी. तिच्या शरीरातून बाहेर पडलेल्या Ectoplasm मधून निर्माण झालेले शरीर तिच्या शरीराचा, अथवा पडद्याचा आधार घेत असे. ** माध्यमाच्या शरीरातून, बाहेर पडणाऱ्या त्या द्रव्य पदार्थास Ectoplasm ही संज्ञा देण्यात आली आहे. Baron Shreneck यांनी, मादाम बिसाँच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे : " या Ectoplasm च्या ठायी दृश्य आकार घेण्याची व त्या अवयवांना वस्तू हातात घेण्याचे व त्या आकारांना मानवी चेहरे व पूर्ण देहाकृती बनविण्याचे सामर्थ्य असते हे स्पष्ट आहे."

French शल्य विशारद Dr. Gustav Felley यांनी १९१५-१९१८ दरम्यान एकूण १८ महिने Eva च्या बैठका घेतल्या. पहिले १५ महिने, मादाम बिसाँच्या घरी व नंतर तीन महिने स्वतःच्या प्रयोगशाळेत घेतल्या. त्यांचे प्रयोग वैज्ञानिक दृष्ट्या महत्वाचे होते कारण १) त्यांवर त्यांचे स्वतःचे नियंत्रण होते; Eva नेही त्या गोष्टीस कधीच हरकत घेतली नव्हती. २) नामवंत शास्त्रज्ञ निरीक्षक म्हणून हजर होते. ३) त्या निरीक्षकांपैकी, बहुतेक जण, वैद्यक क्षेत्रातील होते. Dr. Gelley, Eva स संमोहित तंद्रावस्थेत नेऊन, नंतर cabinet मध्ये बसवीत व त्या नंतर घडत गेलेल्या प्रकारांची छायाचित्रे, Flash Light मध्ये घेत ** ही छायाचित्रे त्यांनी Institute of Psychology च्या वार्षिक अधिवेशनात दाखवली.

Eva च्या शरीरातून आलेला Ectoplasm कधी लहानसर व अर्धवट आकार घेई. आकारास आलेला चेहरा,

प्रथम सपाटसर असे व पाहता-पाहता भरीव होत असे. काही वेळा Ectoplasm मधून घाटदार अवयव न बनता, लुळ्या व थंड बोटासारखे अवयव बनत. केसांच्या अस्ताव्यस्त झुलप्यासारखे आकारही निर्माण होत. (Simula cra) Dr. Gelley नी म्हटले आहे : '' माध्यमाच्या ठायी, संघटक शक्ती (Organizing Power) कमी असली की असे बे-घाट आकार निर्माण होतात. हात व केस आहेत परंतु पूर्ण देहाकृती नाही असे जे Systs आढळतात त्यांच्या सारखाच प्रकार होय.

मूर्त-देह निर्माण होण्याचा विलक्षण प्रकार फारच थोड्या भौतिक माध्यमांच्या बाबतीत झाला आहे. तेव्हा त्यांच्या ठायी असाधारण असे काही असावे. कदाचित गर्भावस्थेतील काही घटक कारणीभूत असण्याची शक्यता अथवा, माध्यमाच्या जीवनातील आघातकारी घटना कारणीभूत असण्याची शक्यता काही अभ्यासकांनी सुचविली आहे.

कोणी Spirit काही एक हेतून उपस्थितांशी, साक्षात संपर्क साधण्यासाठी माध्यमाच्या शरीराचा उपयोग करून घेत असेल काय, अथवा माध्यमाच्या उपचेतनाचा (sub-conscious) त्या दुसऱ्या शरीराच्या रूपाने आविष्कृत होत असेल काय अथवा माध्यमाच्या मनात विशिष्ट spirits च्या अस्तित्वावर विश्वास बसत असल्यामुळे ते दुसरे शरीर 'त्या' spirit ची भूमिका बजावीत असेल काय इत्यादी प्रश्न उपस्थित करता येतील.

**Dr. Gelley यांचे प्रतिपादन :**

माध्यमाच्या शरीरातून बाहेर पडलेल्या Ectoplasm मधून सावयव व कृतिक्षम शरीर बनते हा प्रकार म्हणजे, वरच्या दर्जाचे शरीरविज्ञान (Super-Physiology) होय असे Dr. Gelley यांनी प्रतिपादन केले. त्यांनी म्हटले की, सामान्य जीव व शरीराच्या उत्क्रांती बाबत असाच प्रकार घडत असतो. Ectoplasm मधून शरीराच्या निर्मितीची प्रक्रिया आणि सामान्य जीव-शरीराच्या निर्मितीची प्रक्रिया या दोहोंमध्ये तत्त्वत: फरक नाही. सामान्य जीवशरीर व ectoplasm चे बनलेले शरीर ही दोन्ही एकाच मूलद्रव्यातून निर्माण होत असतात. अंत:स्थ चेतना तत्वावर भर देऊन Dr. Gelley यांनी म्हटले आहे की जीवोत्क्रांती विषयक Darwin, Lammmark व DeVries यांचे सिद्धांत अपुरे आहेत.

J.B. Lammark यांनी असे प्रतिपादन केले होते की सजीवांचे (organisms) अर्जित गुणधर्म (acquired characters) अनुवंशत: एका पिढीतून, पुढील पिढीमध्ये संक्रमित होतात. परिस्थितीनुसार बदल होत जातो, असे त्यांचे प्रतिपादन होते. पाण्यामध्ये वाहणाऱ्या वनस्पतींचे उदाहरण देऊन त्यांनी म्हटले की पाण्याखाली असलेल्या पानांवर, पाण्याचे घर्षण होत असल्यामुळे ती लहान व पातळ राहतात व पाण्याच्या पृष्ठभागावरील पाने मोठी व जाड होतात. जे अवयव विनावापर राहतात ते अनुपयोजनाचा परिणाम म्हणून निर्बल होऊन लोप पावतात व पुढील पिढीत दिसून येत नाही. (atrophy through disuse)

Charles Darwin यांनी सजीव शरीरात सतत बदल (Variations) होत असतात, ते अनुवंशत: संक्रमित होत असतात आणि उत्पन्न होणाऱ्या असंख्य जीवांना पुरेल इतके अन्न उपलब्ध नसल्यामुळे, ज्या जीवजाती परिसराला तोंड देण्यास समर्थतम असतात त्या टिकून राहतात. ते बदल का होतात या संबंधी Darwin यांनी काही म्हटले नाही. दुसऱ्या शब्दात असे की जीवजातींची निवड निसर्गत: होत असते व समर्थनीय जाती टिकून राहतात. (Strugle for existence, natural selection & survival of fittest)

H.De Vries यांच्या मते, सजीवांच्या शरीरामध्ये अकस्मात बदल (accidental mutations) होत जातात व ते अनुवंशत: संक्रमित होतात.

रंगसुत्रे व जनुके यांच्या मध्ये बदल होत जातो हे जीवशास्त्रज्ञांनी दाखून दिले आहे. त्यांच्या मते पेशीचे विभाजन, दहा लाख वेळा झाले तर त्यांच्यात फक्त एकदोनदाच बदल घडून येण्याचा संभव असतो. जीव शास्त्रज्ञांचा तर्क असा आहे की जर ६०० ते ९०० इतके बदल (Mutations) झाले तर नवी उपजाती निर्माण होईल.**

स्वतःच्या प्रतिपादनास पुष्टी म्हणून Dr. Gelley यांनी crysalis (फुलपाखरू) या किड्याचे उदाहरण दिले आहे. या किड्याच्या भोवती प्रकाशा पासून संरक्षण करणारे आवरण असते. त्याच्या आत या किड्याच्या शरीराचे विघटन होते, मज्जातंतू, स्नायुतंतू आणि आतडी (viscera) चा बहुतांश भाग या सर्वांचे रूपांतर होऊन सायीच्या गोळ्यासारखा लगदा बनतो व नंतर त्या लगद्यातून क्रमाक्रमाने नवीन शरीर बनते. हे मूल-द्रव्य स्पंदनशील बनते त्यामध्ये उर्मी (impulse) निर्माण होते. ह्या उर्मीचे स्वरूप वैज्ञानिक सांगू शकलेले नाहीत. Gelley यांनी म्हटले आहे की, ह्या फुलपाखरांच्या बाबतीत, घडणारा प्रकार असे दर्शवतो की सजीव द्रव्याहून (organic matter) श्रेष्ठ अशी एक प्रेरक संचालक व संघटक चेतना (consciousness) जैविक द्रव्यकणांना संघटित करून अवयवांची निर्मिती करीत असते. या अर्थाने (immanent) तत्त्व संचालन करीत असते, ही गोष्ट भ्रूण शरीराचा विकास ही दर्शविते.

**मूर्त-अवयव निर्मितीची छायाचित्रे :**

Occult Review च्या तिसाव्या खंडात (पान नं. ६२, ६३, ६५, ६७) ectoplasm चा स्राव व त्यातून अवयवांची निर्मिती दर्शविणारी छायाचित्रे दिलेली आहेत. Eva.C. च्या तोंडातून, ectoplasm बाहेर पडत असल्याचे एक चित्र आहे. दुसरे छायाचित्र त्या ectoplasm ला तळ हाताचा आकार माध्यमाच्या मस्तकावर येत असल्याचे आहे. तिसरे छायाचित्र मस्तक आकार घेत असल्याचे आहे. चौथे छायाचित्र ectoplasm मधून संपूर्ण देह आकार घेत असल्याचे आहे. खंड क्रमांक ३३, पान नं. ५,७,९ पहिले छायाचित्र छोट्या आकाराच्या स्त्रीचा चेहरा निर्माण झाल्याचे आहे. दुसरे छायाचित्र प्रथम मस्तक व त्यानंतर अवयव बनत चालल्याचे आहे. तिसरे छायाचित्र स्त्रीचा चेहरा, आकार घेत असल्याचे आहे.

Dr. Gelley यांचे प्रतिपादन भारतीय सांख्य दर्शनाची आठवण करून देते. 'पुरुष' तत्वाच्या सामिप्यामुळे, प्रकृती नामक मूल द्रव्य चेतवत् बनते, बुद्धियुक्त होते व त्यापासून अहं-काराचा टप्पा व पुढे ज्ञानेंद्रिय म्हटले आहे. (प्रकृते महत् महत: अहंकारा: पंच तनमातराणि, पंच ज्ञानेंद्रियाणि, पंच कर्मेंद्रियाणि इ.)

Physical Research च्या क्षेत्रात काही अस्सल माध्यमे आढळली तसे, अस्सलांनी नक्कल करून भाबड्या लोकांना फसवणाऱ्या व्यक्तीही आढळलेल्या आहेत, हेही तितकेच खरे. मूर्त-देह निर्मितीच्या प्रकाराच्या संदर्भात हेलन डंकन या ग्लासगो येथील महिलेचे उदाहरण देता येईल. या महिलेची संपूर्ण अंग-तपासणी घेतलेली होती, ती बसणार होती त्या खोलीची पूर्ण तपासणीही केलेली होती. तिच्या शरीरातून बाहेर पडलेला ectoplasm चे फोटो तपासले तेव्हा, कापडाची वीण, कापडावरील मळकट डाग इत्यादि दिसून आले. त्यावरून तेथे उपस्थित असलेल्या दोन डॉक्टरांनी असा तर्क व्यक्त केला की तिने, स्वतःच्या पोटात पिशवी सारखे जणू दुसरे पोट ठेवले असेल व त्यामध्ये ठेवलेला चीझ पेपर तोंडातून ओकून काढला असेल.

टीपा :

*१ त्यांच्या ग्रंथांचे भाषांतर : E.E. Fourier dAbley, phenomena of Materialization Kegan Paul

*२ सविस्तर वृत्तांत पहा : व. वि. अकोलकर ''परामानस शास्त्र'' पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन

*३ Bisson : Les Phenomenes dits de Materialization (1914) Fleix Aleon, Paris

*४ Occult Review Vol. 30 August 1919 ed. Raiphshiriey S.E.Brarde : Limits of indluze (1980) Routleege 7 Kegnon Paul.

*५ National Council of Educational Research and Tranning (1967)

•••

# परिसर वार्ता

**प्रा. मोहन पाठक**

### बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

मार्च महिन्याची सुरुवात झाली तीच अनिश्चिततेने. २ मार्च पासून सुरू झालेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संपामुळे परीक्षा होणार की नाही याची चिंता विद्यार्थी व पालकांच्या मनात होती. १६ दिवस चाललेला संप १७ मार्चला संपून महाविद्यालये पूर्ववत सुरू झाली. या दरम्यान मागे पडलेल्या प्रात्यक्षिकांच्या परीक्षा आता सुटीच्या दिवशीही काम करून घेण्यात येणार आहेत. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे सदर संपाची वेळ आली असे संघटनेकडून सांगण्यात आले. आपल्या महाविद्यालय परिसरात संप १००% यशस्वी झाल्याचे श्री. श्रीराम जाधव व प्रकाश शेंबेकर यांनी सांगितले. "१७ मार्च रोजी झालेल्या बोलण्यांमध्ये शासनाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या चार प्रमुख मागण्या मान्य केल्या. यावरून कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाची दिशा बरोबर होती" असे मत श्री. श्रीराम जाधव यांनी दिशासाठी बोलताना व्यक्त केले.

संप मिटला व आमच्या विज्ञान महाविद्यालयातले व परिसरातलेही वातावरण परीक्षामय झाले. 'एक्झाम फीवर'ने ग्रस्त झालेले विद्यार्थी, परीक्षेच्या तयारीत मग्न झालेले विद्यार्थी ही या दिवसांची पारंपरिक आढळणारी प्रमुख लक्षणे. आमच्या विज्ञान महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष विज्ञान (सांख्यिकी) वर्गातील विद्यार्थ्यांनी निरोप समारंभाचे आयोजन केले होते. असे निरोप समारंभ म्हणजे भावनेचा धागा बळकट करणारे प्रसंगच !

दरम्यान विज्ञान महाविद्यालयात पदार्थ विज्ञान विभागातले एक जुने प्राध्यापक एम्.सी.वाकडे अनेक वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले. तर रसायन शास्त्र विभागातील एक जुने प्राध्यापक प्रदीप वैद्य यांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली.

संप मिटल्यानंतर आमच्या महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'संयुजा' विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आला. उपलब्ध असणारा वेळ, कामांचा व्याप यामुळे समारंभपूर्वक प्रकाशन करावयाचे असूनही, तो विचार मागे ठेवावा लागला. विद्यार्थ्यांना वेळीच अंक मिळणे महत्वाचे होते. सदर अंक प्राचार्य सी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा. विनायक बुखुले यांच्या संपादनाखाली तयार झालेला आहे. या व आमच्या इतर संस्थांच्या वार्षिक अंकांबद्दल 'दिशा' च्या पुढील वर्षीच्या पहिल्या अंकात आढावा घेण्यात येईल.

### जोशी बेडेकर महाविद्यालय

संगणक प्रशिक्षण ही आजच्या काळाची गरज आहे. जोशी बेडेकर महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षणाचे विशेष वर्ग शासनाच्या साहाय्याने जानेवारी महिन्यात सुरू करण्यात आले. शासनातर्फे माधवी नाईक यांना प्रशिक्षित अध्यापिका म्हणून पाठविण्यात आले. प्राचार्य स.वा. गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली सुनीता देशपांडे, छाया कोरे व अंजली पुंदरे या शिक्षिकांच्या साहाय्याने 'संगणकाची ओळख' या नावाने हा अभ्यासक्रम राबविला जात आहे. ४ महिन्यांच्या या अभ्यासक्रमासाठी ६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून ९ गटांत त्यांची विभागणी करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयातील वेळापत्रकानुसार प्रात्यक्षिकांच्या वेळेचे आयोजन केले गेले आहे.

चार महिन्यांचा हा अभ्यासक्रम एप्रिलअखेर संपणार आहे. विद्यार्थ्यांना सुरुवातीस DOS शिकविण्यात आले. त्यानंतर WORD STAR चे प्रशिक्षण दिले गेले व एप्रिल अखेरपर्यंत DBASE चे प्रशिक्षण पूर्ण होईल. यातील एका विद्यार्थ्याशी बातचीत केली असता तो म्हणाला, 'आमच्या दैनंदिन अभ्यासात व्यत्यय न येता मिळणारे हे प्रशिक्षण

म्हणजे उत्तम संधी आहे. पुढील वर्षीही आम्हाला अशी संधी महाविद्यालयाने उपलब्ध करून द्यावी.'

अभ्यासक्रमाची उपयुक्तता तपासण्यासाठी ३० मार्च रोजी शिक्षकांनी एका स्पर्धेचे आयोजन केले होते. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य स.वा. गोखले यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या वर्गासाठी उपयुक्त असणारी काही पुस्तकेही शासनाने पाठविली आहेत. या वर्गातील प्रशिक्षण पाहून महाविद्यालयातील काही शिक्षकांनीही आपल्याला असे प्रशिक्षण घेण्यास आवडेल असे सांगितले.

दि. ३१ मार्च रोजी Computer Presentation Programme आयोजित करण्यात आला होता. यात विद्यार्थी व शिक्षकांनी या वर्गातील शिक्षणाविषयी मनोगते व्यक्त केली. पुढील वर्षी याहून अधिक विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा अशी इच्छा प्राचार्य स.वा.गोखले यांनी व्यक्त केली.

विज्ञान महाविद्यालयाप्रमाणे जोशी बेडेकर महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'युवाशिल्प ९८' सध्या विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येत आहे. प्राचार्य स.वा.गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. पद्मिनी मूर्ती यांच्या संपादनाखाली तयार झालेल्या या वार्षिक अंकाचे प्रकाशन विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांच्या हस्ते झाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य स.वा.गोखले होते. याप्रसंगी बोलताना संपादिका डॉ. पद्मिनी मूर्ती यांनी युवाशिल्प मागील भूमिका स्पष्ट केली. युवाशिल्पाचे मुखपृष्ठ बनविणारे श्री. प्रमोद वाघल व मुद्रक सतीश चव्हाण यांचा प्राचार्यांच्या हस्ते सन्मानचिह्न देऊन गौरव करण्यात आला.

सदर समारंभात प्रकाशन संपन्न होण्यापूर्वी डॉ. विजय बेडेकर यांनी विद्याप्रसारक मंडळातर्फे चालू करण्यात येणाऱ्या इंटरनेट सेवेविषयी उपस्थितांना माहिती दिली. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थ्यांनी सभासद होऊन व प्रकल्पात सहभागी व्हावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. गौरी तिरमारे यांनी केले. प्रा. नागेंद्रप्रसाद राय यांनी आभारप्रदर्शन केले .

**व्यवस्थापन अध्ययन संस्था**

विद्याप्रसारक मंडळाच्या व्यवस्थापन अध्ययन संस्थेतर्फे २१ मार्च रोजी रोटरी क्लब ऑफ मिडटाऊनच्या सहकार्याने टाटा इन्फोटेक कंपनीचे संचालक श्री. किशोर भालेराव यांचे 'मुलाखतीचे तंत्र' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानात श्री. भालेराव यांनी मुलाखतीची पूर्वतयारी, त्यावेळी असावी अशी वेषभूषा, प्रश्नांना सामोरे जाण्याचे कौशल्य आदी बाबींचा ऊहापोह केला. तसेच तीन उमेदवार विद्यार्थ्यांच्या मुलाखतींची प्रात्यक्षिके घेऊन इष्ट अनिष्ट मुद्द्यांचा परामर्श घेतला.

या कार्यक्रमास विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, कार्यवाह श्री. अ.धों. टिळू, विद्यार्थीवर्ग, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास संस्थेचे संचालक श्री. भालचंद्र दाते यांचे मार्गदर्शन लाभले होते.

व्यवस्थापन संस्थेतर्फे यंदापासून इंडियन मर्चंटस चेंबरचा आयात निर्यात पदविका अभ्यासक्रम जुलै ९७ पासून सुरू केला आहे. या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे श्री. दाते सरांनी सांगितले.

**विद्याप्रसारक मंडळ कार्यालय व सभागृहाचे उद्घाटन**



नूतनीकरण केलेल्या कार्यालयाचे उद्घाटन करताना डॉ. वा.ना. बेडेकर

दि. १५ मार्च रोजी आमच्या विद्या प्रसारक मंडळाच्या नूतनीकरण केलेल्या कार्यालयाचे व कार्यकारिणीच्या सभांसाठी बांधण्यात आलेल्या नव्या सभागृहाचे उद्घाटन मंडळाचे अध्यक्ष व विश्वस्त डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते संपन्न झाले या प्रसंगी मंडळाचे आणखी एक विश्वस्त श्री. ह. ठा. ठाणावाला, पदाधिकारी, कार्यकारिणीचे सदस्य, कार्यालयातील कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. इंजिनीअर, व्यवस्थापन संस्थेचे संचालक श्री. भालचंद्र दाते, डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. अ.वि. सहस्रबुद्धे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कंटक, पूर्वप्राथमिक विभाग प्रमुख श्रीमती मोने आदी मान्यवर उपस्थित होते.



**नवीन सभागृहाचे उद्घाटन करताना डॉ. वा.ना. बेडेकर**

कार्यकारिणी सभेसाठी बांधण्यात आलेल्या सभागृहाच्या उद्घाटनासाठी रांगोळ्या काढून व सजावट करून सभागृह सजविण्यात आले होते. या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर व कार्यवाह श्री. अ. धों. टिल्लू यांची समयोचित भाषणे झाली. ६० वर्षे पूर्ण होऊनही कार्यकारिणीच्या सभांसाठी स्वतंत्र जागा नव्हती. आता ही उणीव दूर झाली असे सांगून श्री. टिल्लू यांनी मंडळाचे कार्यकारिणी सभासद श्री. मा. य. गोखले यांच्या पाठपुराव्यामुळे हे शक्य झाले आहे असे आवर्जून सांगितले. भोजनाच्या कार्यक्रमानंतर या समारंभाची सांगता झाली.

## इंटरनेट सेवा उपक्रमाचे उद्घाटन

आमच्या महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृह ही सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांची उत्तम सोय ठरले आहे. वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर विद्याप्रसारक मंडळाने सुरू केलेल्या इंटरनेट सेवा उपक्रमाचा उद्घाटनसमारंभही या देखण्या सभागृहात संपन्न झाला. प्रत्यक्षात उद्घाटन, विधी महाविद्यालयात जेथे हे केंद्र आहे तेथे जाऊन डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. हा प्रसंग केबलच्या साहाय्याने पेशवे सभागृहात प्रक्षेपित करण्यात आला. उद्घाटन संपन्न होताच उपस्थितांना पेढे वाटण्यात आले.

या समारंभाची सुरुवात डॉ. विजय बेडेकर यांच्या स्वागत व शुभेच्छापर भाषणाने झाली. उद्घाटनानंतर बोलताना ते म्हणाले, 'विद्याप्रसारक मंडळ ही काळाबरोबर जाणारी संस्था आहे. इंटरनेट हा आजच्या गतिमान जीवनाचा अविभाज्य भाग आहे. इंटरनेटवर प्रसार होण्यासाठी सहकारी तत्त्वावर हा प्रयोग करीत आहोत.' या वेळी इंटरनेट द्वारा माहिती मिळवण्याची प्रात्यक्षिके श्री. निनाद प्रधान यांनी दाखविली तर डॉ. विजय बेडेकरांनी त्याबद्दल माहिती दिली. इंटरनेटवर 'दिशा' गेल्याचे सांगून त्यामुळे अमेरिकेतील बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी ई- मेल द्वारा संस्थेशी संपर्क साधला. मुकुंद बुद्धिकोट व अन्य काही विद्यार्थ्यांनी अमेरिकेत एकत्र येऊन महाविद्यालयासाठी व विद्याप्रसारक मंडळासाठी साहाय्य करण्याची तयारी दर्शविली आहे. ही माहिती डॉ. विजय बेडेकर यांनी दिली.

एम.टी.एन.एल. चे श्री. जयरामन, जॉन्सन अँड जॉन्सन चे डॉ. केळकर आदींची या प्रसंगी भाषणे झाली. विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री.वि. करंदीकर यांनी आभारप्रदर्शनाचे भाषण केले.

या सेवेचा लाभ विद्यार्थी व प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने घ्यावा असे आवाहन विद्याप्रसारक मंडळाने केले आहे.

•••

# पर्यावरणाचे वाढते तापमान आणि अमेरिकन उद्योग समुहाची भूमिका

**GREENPEACE ' AMERICAN INDUSTRY AGAINST THE PLANET' BRIEFING**

**3rd December 1997**

* Obstructive role of the fossil fuel industry has been profiled by the chiefs of the climate treaty : the opening speech by the Executive Secretary of the negotiations hit out at the " propaganda that emanates from certain industrial sectors that are on the defensive, propaganda that unashamedly plays games with the science and statistics of climate change."

* American industry - Big Oil and the Big Car lobby are spearheading a campaign with one simple objective-to derail any Kyoto agreement to protect the climate-specifically obstructing legally binding targets and timetables to cut greenhouse gas emissions. Household names like Exxon, Mobile, Ford, Chrysler, Shell Oil are spearheading efforts to protect their fossil fuel profits/

* The core issue is whether government buckle to the oil industry's lobbying efforts rather than act on the evidence of the world's scientists and experts pointing to the dangers of climate change. There is a growing voice from the clean energy industry and the insurance industry pointing out the opportunity for change and the costs of failing to make that change.

* The United States government has ignored the survival greenhouse proposals of AOSIS in favour of a weak negotiating position influenced by the lobbying efforts of companies hiding behind the Global Climate Coalition and the American Petroleum Institute.

* looking at the economies of scale - referencing Greenpeace League tables-the most vulnerable small island states represented by the Alliance of Small Island States (AOSIS), have an economic wealth less than that of one single company-General Motors. Exxon and Shell rank higher than 134 parties to the Convention if country GNP's and company revenues are compared. Totaling the 1995 revenues of the top 'dirty dozen' car and oil companies (directly or indirectly) involved with the Global Climate Coalition results in a figure higher than the GNP of China-collectively qualifying for membership of the G7.

* The deliberate and highly political campaign run by the oil industry has been spearheaded by Exxon. It said to the US public-through its sponsorship of a $ 13 million aggressive advertising campaign-that developing countries are being let off the hook from treaty agreements. Meanwhile Exxon, on behalf of the American Petroleum Institute argued that developing countries should join it in opposing climate agreements, it falsely claimed would strangle economic growth (World Petroleum Congress, Beijing, Oct 1997).

* In the US oil companies have funded the political process to the tune of $53.4 million dollars since 1991 (reference Greenpeace report 'oil the Machine') with over three quarters of the funding going to the Republicans. The Senate which must ratify any treaty agreed in Kyoto-adopted a resolution mid-year that they would not agree to anything which did not include specific developing country agreements : a demand strongly pushed by the fossil fuel industry, and one which runs counter to the agreement that all countries have made under

the Berlin Mandate that industrialised countries will act first.

* solutions are feasible and already cost effective -wind, solar power, energy efficiency. The real-world debate is about governments making a choice between fossil fuels and clean energy. Nuclear energy is not a solution to climate change -the nuclear industry is here in a 'last gasp' to justify its existence. In Greenpeace's view the choice to replace fossil fuels with nuclear power would be like making a choice between malaria and cholera.

* the insurance industry will be holding a seminar in Kyoto on Friday at lunchtime to talk abouts its concerns about the costs and economic impacts of climate change. Insurance and reinsurance companies represented by the Insurance Industry Initiative as well as 'solutions' companies-many represented by the Business Council for Sustainable Energy are calling for government leadership and action to cut greenhouse gas emissions. The insurance industry is a $2 trillion industry around 4 times the revenues of the oil industry.

•••

(पान क्र. ८ वरून)

## शिल्पकलानिधी कृ.वि. वझे

८. आजच्या स्वराज्य संस्था : ग्रामपंचायती, म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डे इत्यादी संबंधी, पुणे.

९. प्राचीन युद्धविद्या, १९३४, मुंबई.

१०. विद्यार्थ्यांचे धर्म, १९२३, नाशिक.

११. व्यापारी शिक्षणमाला, पुस्तक पहिले, १९२३, नाशिक

१२. आर्यशिल्प-हिंदी यंत्रशास्त्र ('विश्वब्रह्मवृत्त' तील), पुणे.

१३. आर्यशिल्प-वास्तुशास्त्र घर बांधण्याविषयी व वनस्पतीसंबंधी ('विश्वब्रह्मवृत्त 'तील), पुणे.

१४. हिंदी शिल्पशास्त्र - भाग पहिला, प्रस्तावना खंड-सामान्य माहिती, १९२८, पुणे.

१५. प्राचीन हिंदी शिल्पशास्त्र, १९२४, नाशिक

१६. प्राचीन हिंदी शिल्पशास्त्र - भाग चौथा, १९३१, पुणे.

१७. शिल्पशिक्षणाचे महत्त्व, १९२४, तळेगाव दाभाडे, जि. पुणे.

१८. आर्यशिल्प-चित्रविद्या अथवा चित्रलेखनशास्त्र, शके १८४६, पुणे.

१९. हिंदु संघटन

२०. अस्पृश्यतानिवारण

२१. कश्यप संहिता (संस्कृत भाषेत).

•••

(मुखपृष्ठ २ वरून)

संपादकीय

**वास्को-द-गामा - किती हवा किती नको !!**

साहजिकच कालीकतचे मुसलमान व्यापारी आणि वास्को-द-गामा यांचे खटके उडू लागले. झामोरिनच्या नौदलाचा प्रमुख कुंजली मर्रक्कर हा मुसलमान नाविक होता. त्याने वास्को-द-गामाशी निकराची झुंज दिली. शेवटी वास्को-द-गामाने त्याला पकडुन त्याचा शिरच्छेद केला. वास्को-द-गामाने अनेक हिंदुंना गुलाम म्हणून घेऊन कालिकतहून पोर्तुगालकडे प्रयाण केले. पोर्तुगालला परतल्यावर त्याने दाखवलेल्या शौर्याबद्दल त्याचा मोठा सत्कार करण्यात येऊन, राजाने त्याला अनेक वस्तू भेटही दिल्या. भारताच्या दुसऱ्या प्रवासामध्ये गामाने गोव्याला भेट दिली आणि तेथून तो कालिकतच्या पूर्वेकडे असलेल्या केन्नेनोर या बंदराकडे गेला. तेथे त्याने अरबी व्यापाऱ्यांच्या बोटी बुडवल्या, त्यांचा माल लुटला. सुमारे ४०० प्रवासी असलेल्या काही बोटी बंद करून त्याने प्रवाशांसकट त्या जाळल्या. गामाच्या या क्रूरपणाला आजही तोड नाही. केन्नेनोरचा राजा व झॅमोरीन यांच्यामध्ये त्यावेळी फारसे सख्य नव्हते. गामाने केन्नेनोरच्या राजाशी समेट करण्याचा प्रयत्न केला. या दुसऱ्या प्रवासातही कालिकतच्या झॅमोरीनने वास्को-द-गामाला सहकार्याचा हात देऊ केला होता. वास्को-द-गामाने तो नाकारला एवढेच नाही तर कालिकतमधल्या सर्व मुसलमान व्यापारी आणि खलाशांना हाकलून देण्याचा आदेश त्याने झॅमोरिनला दिला. झॅमोरिन त्यावेळी या गोष्टी मान्य करेना त्यावेळेस गामाने ३८ हिंदू कोळ्यांना पकडून त्यांना मारले आणि त्यांची प्रेते समुद्रांत फेकून दिली. हाजला जाणाऱ्या मुसलमानांच्या बोटीही त्याने बुडवल्या.

वास्को-द-गामाचे हे जुलूम आणि अत्याचार कालीकतचे मुसलमान आजही विसरायला तयार नाहीत. वास्को-द-गामापेक्षा त्यांच्याशी लढणारा कुंजली मर्रक्कर हा झामोरिनचा मुसलमान नौसेनानी ते आपला 'हिरो' मानतात. जमाते इस्लामी तसेच अनेक सुनी मुसलमानांनी केरळ सरकारला आणि भारत सरकारला वास्को-द-गामाचा उदोउदो करणारा हा समारोह साजरा न करण्याची विनंती केली आहे. केरळच्या डाव्या सरकारनेही आता हा समारोह फारसा मोठ्या प्रमाणावर न करण्याचे ठरविले आहे. सुदैवाने भारत सरकारनेही आपली भूमिका अशीच ठेवलेली दिसते. तेव्हा हा प्रश्न हिंदूंच्या विरोधाचा नसून वास्को-द-गामाने मुसलमानांवर केलेल्या भीषण अत्याचारांशी तो निगडीत आहे. वास्को-द-गामाच्या साहसाचे कौतुक अवश्य करायला हवे. वास्को - द -गामाचे पोर्तुगालमध्ये होणारे कौतुक हे प्रामुख्याने त्यानी पोर्तुगालची सत्ता स्थापन करण्याकरिता केलेले प्रयत्न आणि ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य यामुळे आहे. आणि म्हणूनच वास्को-द-गामाच्या या ऐतिहासिक प्रवासामधून योग्य तो बोध घ्यावा आणि संयम आणि विवेकानेच त्याचे समारंभ साजरे करावेत.

•••